MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष चौदावे / अंक १ / जानेवारी २०१३

## संपादकीय

### आपण आत्मपरीक्षण करणार का?

२०१२ हे वर्ष सरता सरता अवघ्या देशावर मळभ घेऊन आले. हे मळभ व्यथित करुन सोडणारे तर आहेच; पण त्याबरोबरच सर्वांच्या मनावर एक भळभळणारी जखम करणारे आहे. पुढच्या अनेक वर्षांत ही जखम भरुन येणारी नाही. दोन दशकांपूर्वी जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणांना आपण मान्यता दिली. त्यामुळे देशातील एका मोठ्या समूहाचे जीवनमान उंचावले. लायकी नसलेल्या लांकांच्या हातात पैसा खुळखुळू लागला. पण या श्रीमंतीबरोबरच विचारांची श्रीमंती आपण हरवून बसलो की काय, हा प्रश्न या घटनांनी आपल्यासमोर उभा केला.

अशा घटनांमागील कारणांचा मागोवा घेऊन ती कारणे नष्ट करता येतील, अशी शक्यता नसली तरी ते आवश्यक वाटू लागले आहे. या समस्यांबाबत केवळ चर्चा करून, निदर्शने करून पालक, युवक, पोलीस यंत्राणांनी एकमेकांवर दोषारोप करून मार्ग निघणार नाही; तर या विरोधात काळाशी सुसंगत उपाय योजना करणे आवश्यक ठरेल. त्यासाठी संवेदनाशील होऊन अधिक संघटित होणे ही सामाजिक गरज आहे. कायदे करून, आहे त्या कायद्यांत सुधारणा करून हे चित्र बदलेल यांची शक्यता लोकांना वाटत नाही. कारण कायद्याची अंमलबजावणी, लागणारा अवधी, कायद्यांतील पळवाटा या सर्वांचा अनुभव नित्याचा आहे. त्यामुळे लोकांचा यावरील विश्वास डळमळीत आहे.

या सर्वांमागील प्रमुख कारण प्रदूषित सामाजिक वातावरण हे आहे. दूरदर्शनोत्तर व दूरदर्शनपूर्व अशा दोन्ही कालखंडांचा विचार केल्यास १९७२ नंतर या प्रकारच्या (यात आत्महत्यांचाही विचार आहेच) घटनांची संख्या आंवर घालण्या पलीकडे वाढत चालली आहे. उदा. तथाकथित 'रिॲलिटी शो' मध्ये जे कोणी परीक्षक असतात ते राजरोजसपणे एखाद्या युवतीला 'आज आप बहोत सुंदर दिख रही हो' असे म्हणायला धजावतात व हे समाजमान्य होते. यावरून आमच्या संकल्पनांचे काय चालले आहे, त्याची कल्पना यावी. प्रसार माध्यमांत फक्त दूरदर्शनच नाही, चित्रपट, वृत्तपत्रे कोणतेही माध्यम ह्या कुसंस्कार घडवण्याची जणू स्पर्धाच चालू आहे. कोणतेही माध्यम मुळात वाईट नसते तर त्याचा होणारा वापर चिंताजनक असतो. दूर्शनबद्दल अधिक बोलले, लिहिले जाते, कारण ते घराघरात चोवीस तास बघितले जाते. कोणत्याही

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय)**

भाषेतील मालिका, जाहिराती, बातम्या, रात्री उशीरा दाखवले जाणारे कार्यक्रम यांसह सर्वच कार्यक्रमांतून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, कळत नकळत बटबटीतपणे 'बीभत्स' हा शब्द ही आळणी ठरेल असे जे काही दाखवले व पाहिले जाते. त्यावर त्वरित बंदी यायला हवी. या अनैतिकतेच्या पाठशाळा आहेत. या पाठशाळांमधले धडे गिरवूनच आजची तरुण-तरुणीही पोशाख करतात. त्यांची भाषा बिघडते, इतकेच नाही तर वागणे अमर्यादाशील होते. त्यांचे हावभाव, पोशाख समोरच्याला गुन्ह्याला प्रवृत्त करणारे असता कामा नयेत. त्याचबरोबर 'कालबाह्य' ठरवले गेलेले कपाळावरील कुंकू, साड्या, हातातील बांगड्या यांतून स्त्रीचे घडणारे शालीन व्यक्तिमत्त्वही इतिहासजमा झाले आहे.

दूरदर्शन मधील ब्रेकिंग न्यूजमध्ये प्रशिक्षण द्यावे, त्या पद्धतीने गुन्ह्यांचे पुनःपुनः होणारे प्रक्षेपण, चित्रपटांतील अनैतिक दृश्यांना परिनिरीक्षण मंडळीकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे, दारू, सिगारेट वा तत्सम अनारोग्यकारक उत्पादनांच्या जाहिराती या सर्वांमध्ये बलात्कार, अत्याचार, हुंडाबळी, स्त्रीभ्रूण हत्या, आत्महत्या, मानवाचा वस्तू म्हणून केला जाणारा वापर यांची मुळे आहेत. 'डाग चांगले आहेत' अशी जाहिरात करणारी साबणाची कंपनी जणू काही आमच्या सामाजिक चारित्र्यावरील कलंकाची भलावण करते. हे सर्व थांबले तर या घटना घडू नयेत याचा केलेला पहिला प्रयत्न असेल.

'या गुन्हेगारांना शिक्षा' हा वेगळाच आणि तितकाच महत्त्वाचा विषय आहे. या विषयावर वृत्तपत्रांतून अनेक जण अनेक विचार व्यक्त करताना सध्या दिसतात. त्या विचारांमध्ये तथ्यही आहे. पण तेथे पुन्हा मूलभूत प्रश्न आहे. तो याच प्रदूषित समाज व्यवस्थेतील पोलीस यंत्रणेचा, न्याय व्यवस्थेचा. सर्व काही सुधारण्या पलिकडे जाऊन बसले आहे. मूल्यांचे विकृतीकरण, बाजारीकरण आणि या सर्वांना दिली जाणारी मान्यता, समाज जीवनातील 'मान्यवर' व्यक्तींनी केलेले या सर्वांचे नेतृत्व हे चिंताजनक आहे. कायद्याचा धाक नाही, कुटुंबाचा धाक नाही, संस्कारांचे तर विकृतीकरण झाले आहे. अशा स्थितीत निमाण होतात ते असे पशू!

**– मोहन पाठक**

●●●

## वेळ नाही ?

अमाप सुख आहे सगळ्यांच्याच पदरात
पण ते अनुभवायला वेळ नाही

आईच्या अंगाईची जाणीव आहे
पण आईला आज आई म्हणायला वेळ नाही

सगळ्यांची नावं मोबाईलमध्ये सेव आहेत
पण प्रेमाचे चार शब्द बोलायलाही वेळ नाही

डोळ्यांवर आलेय खूप झोप
पण आज कोणाकडे झोपायलाही वेळ नाही

सांगेल कोण कशाला दुसऱ्याबद्दल
जेंव्हा इथे स्वतःकडेच बघायला वेळ नाही

परक्याची जाणीव कशी असेल
जर इथे आपल्याच माणसांसाठी वेळ नाही

अरे जीवना तूच सांग
जगण्यासाठी चालेल्या या धावपळीत
जगायलाच आज वेळ का नाही????

●●●

वर्ष चौदावे/अंक १/जानेवारी २०१३

वर्ष चौदावे/अंक १/जानेवारी २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | 'मी कोण?' | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | अधिक मास | श्री. संजय पाटील | ५ |
| ४) | भेट केंब्रिजच्या व्हिपल संग्रहालयाला | डॉ. सुधाकर आगरकर | ८ |
| ५) | महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारेवर आधारित | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ११ |
| ६) | श्रीमत् भगवद्गीता - विषय प्रवेश | श्री. शं. बा. मठ | १६ |
| ७) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| ८) | अश्लील चित्रपटाची पोस्टर्स सार्वजनिक वहानांवरती आणि रस्त्यावरती लावण्याबद्दल निषेध | सौ. स्वाती बाल तांबे | २७ |
| ९) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | असीम | ३० |
| १०) | मी का नाही ? | श्री. मोहन पाठक | ३२ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात


- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# ‘मी कोण?’

*मान. डॉ. विजय बेडेकर यांचे ‘सद्‌धर्म’चे संपादकीय ‘दिशा’च्या वाचकांसाठी येथे देत आहोत. - कार्यकारी संपादक*

‘मी कोण आहे’ याचे उत्तर आजही शास्त्रज्ञ शोधताना दिसत आहेत. अर्थातच हा प्रश्न खूप जुना असून सर्वच सभ्यतांनी आपापल्यापरीने त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. या संदर्भात भारतीय तत्त्वज्ञानातील त्याची चर्चा ही नक्कीच उजवी ठरते. साहजिकच सृष्टीच्या व्युत्पतीचा विचार करणाऱ्या आधुनिक शास्त्रज्ञांपैकी श्रॉडिंगरपासून काप्रापर्यंत सर्वांनाच भारतीय तत्त्वज्ञानामध्ये या विषयाची गंभीर चर्चा आढळून येते.



**डार्विन**

डार्विनच्या उत्क्रांतिवादाने मानवाच्या बाह्य सांगाड्याचा एकपेशीय ते बहुपेशीय प्रवास उलगडून दाखवला. विज्ञानामध्ये अज्ञानाचा एखादा डोंगर सर केल्यानंतर समोरील अथांग दऱ्याडोंगर अजून पार करायचे लक्षात येते. हाच काहीसा प्रकार उत्क्रांतिवादामध्ये झाला आहे. सुटणारा प्रत्येक प्रश्न नवीन प्रश्नांना जन्म देत आहे.

सर्व जग वस्तुमय आहे, म्हणूनच वस्तूच्या किंवा पदार्थाच्या अंतरंगाचा शोध घेतला की अंतिम उत्तर नक्की मिळणार अशी खात्री १७ व्या ते १९ व्या शतकांतील वैज्ञानिकांना वाटत होती. रसायनशास्त्रापासून ते मानसशास्त्रापर्यंतच्या सर्वच विज्ञान शाखांचा विचार हा पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासातून होऊ लागला.



**न्यूटन**




**देकार्त**

अर्थातच या रूढ भौतिकशास्त्रावर न्यूटनची विश्वाविषयीची कल्पना आणि देकार्तचे पदार्थ व आत्मा यांतील द्वैत यांचा प्रभाव होता. यामुळे विज्ञानाच्या ‘वस्तु’निष्ठ अभ्यासातून मानवी अस्तित्व आणि मानवी व्यवहाराचा गाभा असलेल्या भावना, इच्छा, आकांक्षा, द्वेष, संज्ञा या गोष्टी वस्तुमय नसल्यामुळे या अभ्यासातून हद्दपार झाल्या. ज्ञानाच्या उपासनेमध्ये तर्कप्रज्ञा ही अंतःप्रज्ञेपेक्षा श्रेष्ठ ठरू लागली. अर्थातच यामुळे ‘मी कोण’ या उत्तराच्या जवळ यायच्याऐवजी शुद्ध तर्कावर आधारलेल्या विज्ञानामुळे ती शक्यता धूसर होऊ लागली.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला आइन्स्टाईनचा सापेक्षतावाद आणि मॅक्स प्लँकच्या पुंजवादाने या

तत्त्वाला तपश्चर्येने जाणावे लागते.

आधीच्या यांत्रिकी, गणिती, रूढ भौतिकी सिद्धांतांना धक्का लावायला सुरुवात केली.



**आइन्स्टाईन**

रूढ भौतिकीमध्ये अवकाशाच्या त्रिमितीमध्ये आइन्स्टाईनच्या सिद्धांताने चौथ्या मितीची भर टाकली आणि यामुळेच या सर्व बाजू केवळ स्वतंत्र नसून एकमेकांशी संबंधित आहेत, हे विज्ञानाला मान्य करावे लागले. सापेक्षता आणि पुंज सिद्धांताने हे स्पष्टपणे दाखवून दिले की पदार्थाचे अणुरेणू हे घन वस्तू (Solid objects) नसून अमूर्त, निराकार आस्तित्वे आहेत (Abstract Entity), प्रकाशाचे द्विगुणी अस्तित्व, सूक्ष्म कण (Particles) आणि तरंग (Waves) या विरोधाभासाला रूढ भौतिकीमध्ये नक्कीच स्थान नव्हते. नवभौतिकीमुळे वस्तुनिष्ठ, तर्कप्रधान विज्ञानामध्ये व्यक्तिसापेक्षता आणि अंतःप्रेरणेलाही यामुळेच स्थान मिळाले.

वस्तूच्या अणुरेणूप्रमाणेच २० व्या शतकात पेशींच्या अंतरंगांचीही नवीन उकल झाली. यातूनच जैवयांत्रिकीशास्त्राचा जन्म झाला. आजची नलिका बालिका (Test Tube Baby) ते बीज पेशींच्या रोपणापर्यंतचा सगळा प्रवास या नवभौतिकीमुळेच झाला. पदार्थविज्ञाना पलीकडे इतर विज्ञान शाखा स्वतःचा स्वतंत्रपणे विचार करू लागल्या. तरीही आज 'मी कोण' या प्रश्नाचे अजूनही उत्तर सापडत नाही. नवभौतिकीमध्ये आजही गणिती, यांत्रिकी आणि नियतिवादाचा प्रभाव दिसतच आहे. मस्तिष्कशास्त्र (Brain Science) आणि त्याच्या उपशाखांमध्ये प्रचंड संशोधन होऊनही चेतनेच्या (Consiousness) संशोधनामध्ये आजही फारशी प्रगती होताना दिसत नाही. हा अडथळा विज्ञानातील साधनांचा नसून वैज्ञानिकांच्या मानसिकतेचा आहे.

मानवी संस्कृतींचा प्रवास आजच्या पाश्चात्त्य सभ्यतांपेक्षा हजारो वर्षे आधी पूर्वेकडील सभ्यतांमध्ये चालू आहे आणि चेतनाशास्त्रामधील त्यांचे अभ्यास नक्कीच अधिक उजवे आहेत. २० व्या शतकाच्या सुरुवातीला सापेक्षता आणि पुंजवादाच्या प्रवेशानंतर निदान काही दशके तरी भौतिकी वैज्ञानिक किंवा पदार्थ वैज्ञानिक भारतीय तत्त्वज्ञानाकडे वळले होते. आजच्या 'मी कोण' या शोधाच्या प्रवासामध्ये पुन्हा एकदा या तत्त्वज्ञानामध्ये डोकावून पाहणे फायदेशीरच नाही, तर उत्तराच्या जवळ पोहोचण्यासाठी मदत करणारे आहे.

लंडनची द रॉयल सोसायटी व ब्रिटिश ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'What it means to be human' या विषयावर ८ मार्च २०१२ रोजी परिसंवाद झाला. या परिसंवादातील दोन सत्रांत सहभागी झालेल्या विद्वानांनी या अनुषंगाने 'मी कोण' या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. हा परिसंवाद लंडनची रॉयल सोसायटी आणि ब्रिटिश ॲकॅडमीच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अभ्यासूंनी तो अवश्य ऐकावा.

**–डॉ. विजय बेडेकर**
माननीय संपादक, दिशा

●●●

# अधिक मास

*अधिक मास म्हणजे जावयाला तीस-तीनचं वाण देणं एवढंच आपणाला विशेषकरून माहीत असतं. इंग्रजी कॅलेंडर ॲडजस्ट करण्यासाठी तो सुरू झाला असं काहीसं आपण ऐकलेलं असतं. या महिन्यात सण येत नाहीत म्हणून तो शुभ कार्यासाठी वर्ज्य आहे असंही आपण ठरवून टाकलेलं असतं. दानासाठी आणि श्रीकृष्णाच्या उपासनेसाठी विशेष महत्त्वाचा असलेला हा महिना अपुऱ्या माहितीमुळे दुर्लक्षित केला जातो. अधिक महिना कसा का आणि केव्हापासून सुरू झाला, त्याला काही पौराणिक, धार्मिक आणि खगोलशास्त्रीय आधार आहेत की तो दुष्काळात तेरावाच आहे..संपादक*

यावर्षी 'अधिक भाद्रपद' होता. महिना अधिक होतो म्हणजे नेमकं काय होतं. त्यासाठी कोणते नियम आहेत, या महिन्याचं धार्मिक-पौराणिक महत्त्व काय असे अनेक प्रश्न तुम्हाला पडले असतील.

इंग्रजी कॅलेंडरप्रमाणं 'ॲडजस्ट' करून घेण्यासाठी अधिक महिना सुरू झाला हा आपला सर्वसाधारण गैरसमज. पण मुळात अधिक महिना घेण्याची पद्धत हिंदू कालगणनेची सुरूवात झाली तेव्हापासून होती. पूर्वी या अधिक मासाला मालमास असं म्हणत. त्यासंदर्भात एक आख्यायिका आहे ती अशी की भगवान नारायण एकदा तपश्चर्येला बसले असताना अचानक नारदमुनींचे तेथे आगमन झालं. भगवानांनी त्यांना येण्याचं कारण विचारलं तेव्हा नारद म्हणाले की, दरवर्षी फक्त बाराच महिने असताना दर तीन वर्षांनी हा अधिकचा तेरावा महिना येतो कुठून? तेव्हा भगवान म्हणाले की आजकाल दुष्कृत्यांचे प्रमाण वाढले आहे. पापांचा हा भार आम्हाला सहन होत नाही अशी तक्रार बारा महिने केव्हापासून करीत होते. शेवटी या बारा महिन्यांनी आपापल्या पोटातील पापाचा तिसरा हिस्सा काढून बाहेर टाकला. त्यापासून हा तेरावा महिना उत्पन्न झाला. म्हणून तो मलमास.

असा हा मलमास सर्व कार्यासाठी निषिद्ध ठरविला जाऊ लागला. त्याला धोंडा मास असंही म्हटलं जाऊ लागलं. उपेक्षा व अवहेलना यामुळं व्यस्थित झालेला हा महिना शेवटी भगवान श्रीकृष्णाला शरण गेला. त्याची व्यथा ऐकून श्रीकृष्णाला दया आली. त्यांनी आपला वरदहस्त त्याच्या मस्तकावर ठेवला आणि म्हणाले, '' विश्वातील सर्व उत्तम गुण माझ्यात असल्यानं मला पुरुषोत्तम म्हणतात. माझं हेच नाव मी तुला देत आहे. आजपासून तू पुरुषोत्तम मास म्हणून ओळखला जाशील. जे तुझी पूजा करतील, ती मला प्राप्त होईल. जे कोणी जप, तप, दान अशा पुण्यकर्मांनी तुझं सेवन करतील त्यांना आयुरारोग्य, संतती, संपत्ती प्राप्त होईल.'' त्यानंतर भगवानांनी आपलं स्वरूप त्याच्यात मिसळून त्याला धन्य केलं. तेव्हापासून या मासाला पुरुषोत्तम मास म्हटलं जाऊ लागलं.

अधिक मासाचा पौराणिक संदर्भ बघितल्यानंतर आता खगोलशास्त्रीय संदर्भ पाहू. त्यासाठी हिंदू कालगणना कशा पद्धतीनं केली जाते ते पाहणं गरजेचं आसहे. मुळात ही कालगणना कृत, त्रेता, द्वापार व कलि अशा चार युगांत विभागली आहे. सध्या कलियुग सुरू आहे. असं म्हणतात की कलियुगाच्या प्रारंभी युधिष्ठिर शकाप्रमाणं कालगणना होत होती. हे शक ३०४४ सौरवर्ष अस्तित्वात होतं. त्यानंतर विक्रमाचं शक सुरु झालं. ते १३५ वर्षे अस्तित्वात होतं. त्यानंतर शालिवाहन शकाला सुरुवात होती. त्याची आता १९२५ वर्षे पूर्ण झाली आहेत. थोडक्यात या युगाची ५१०४ वर्षे पूर्ण झाली आहेत. शालिवाहन शकाची एकूण १८ हजार वर्षे असतील. त्यानंतर विजयाभिनंदन शक सुरू होणार आहे. अधिक मासाची पद्धत नेमकी केव्हा सुरू झाली

याचं उत्तर काही अभ्यासक युगानुयुगे ती सुरू आहे असं देतात तर काही पाच हजार वर्षांपासून ती सुरू आहे असं सांगतात. असो ! इंग्रजी कॅलेंडर अॅडजेस्ट करण्यासाठी ती सुरू झालेली नाही इतकं नक्की.

कालगणनेचा विचार किती विविध प्रकारे ऋषीमुनींनी केला होता ते आता पाहू. हा श्लोक पाहा.

ब्राह्मं दिव्यं तथा पित्र्यं प्राजापत्यं गुरोस्तथा
सौरं च सावनं चांद्रमार्क्षं मानानि वै नव
चतुर्भिर्व्यवहारौत्र सौरचाद्रर्क्षसावनैः

अर्थात कालगणनेचं नऊ प्रकार पुढील आहेत. १) ब्राह्म-ब्रह्मदेवाच्या आयुष्यावरुन २) दिव्य-देवांच्या वर्षावरून. आपलं एक सौरवर्ष म्हणजे देवांची एक अहोरात्र असते. ३) पित्र्य-एका चांद्रमासाएवढं पितरांचं एक अहोरात्र असतं त्यावरून ४) प्राजापत्य - मन्वंतर गणनेवरुन ५) बार्हस्पत्य - गुरु ग्रहांच्या भ्रमणावरुन. ६) सौर - सूर्याच्या भ्रमणावरून ७) चांद्र - चंद्राच्या कलेवरुन. ८) सावन - एका सूर्योदयापर्यंत एक दिवस मानून. ९) आर्क्ष - नक्षत्रांच्या दैनंदिन उदयकालावरून. हिंदू कालगणना वरीलपैकी चंद्राच्या भ्रमणावर (चांद्र) आधारलेली आहे. एक चांद्रवर्ष असतं ३५४ दिवसांचं. मात्र एक सौरवर्ष (पृथ्वीच्या सूर्याभोवती फिरण्याचा कालावधी) असतं ३६५ दिवसांचं. या ११ दिवसांच्या फरकाचा ताळेबंद राखण्यासाठी अधिक महिन्याची योजना ऋषीमुनींनी केली. या ११ दिवसांचा हिशेब केला नाही तर प्रचंड गोंधळाची परिस्थिती होईल हे त्यांना माहीत होतं. हिंदू कालगणना अशी विचारपूर्वक आणि सखोल चिंतनातून तयार झाली असल्यामुळंच आज इंग्रजी महिना आणि हिंदू सण फारसे मागेपुढे होताना दिसत नाहीत. याउलट अन्य धर्मीय कालगणनेत आणि सणांच्या तारखांबाबत वेगळी परिस्थिती असल्याचं आपण पाहतो. इंग्रजी पद्धतीत १ तारखेला महिना सुरू होतो आणि ३० किंवा ३१ ला संपतो. हिंदू पद्धतीत अमावास्येला (प्रतिपदेपासून) महिना सुरू होतो आणि पुढील अमावस्येला संपतो. आता महिन्यांना नावं देण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. ती समजून घेणं गरजेचं आहे. मुळात चांद्र वर्ष आणि सौर वर्ष यांच्यात मेळ राहावा म्हणून पंचांगकर्त्यांनी एक युक्ती योजली. कालगणनेसाठी त्यांनी चंद्राचं भ्रमण प्रमाण मानलं तरी महिन्यांची नावं मात्र सूर्याच्या भ्रमणाप्रमाणं दिली. त्यासंदर्भतील श्लोक असा -

मीमादिस्थो रविर्येषामारम्भे प्रथमे क्षणे
भवेत्ते बदाश्चान्द्रमासाश्चैत्राद्या द्वादश स्मृताः

अर्थात मीनेत सूर्य असताना जेव्हा अमावास्या होते तेव्हा चैत्र महिन्याला सुरुवात होते. मीन नंतर येणारी रास म्हणजे मेष. आता मेषेत सूर्य असताना अमावास्या येईल तेव्हा वैशाख महिन्याला सुरुवात होईल. याप्रमाणेच मांडत गेल्यास वृषभेचा सूर्य असताना ज्येष्ठ, मिथुनेचा सूर्य असताना आषाढ आणि कर्केचा सूर्य असताना श्रावण, सिंहेचा सूर्य असताना भाद्रपद ... वगैरे येईल. एका राशीत सूर्य साधारण एक महिना राहतो. साधारण १४ ते १७ तारखेला तो रास बदलतो. एका अमावस्येला सूर्य ज्या राशीत असेल त्याच राशीत तो पुढील अमावस्येला नसतो. थोडक्यात एक रास पुढे गेलेला असतो. मात्र दर तीन वर्षांनी एकदा अशी अवस्था येते की एक अमावस्येला ज्या राशीत सूर्य असतो त्याच राशीत तो पुढच्या अमावस्येलाही असतो. आपण वर बधितलेल्या नियमाप्रमाणे सूर्य अमावस्येला ज्या राशीत असतो त्या राशीप्रमाणे महिन्याला नावं दिली जातात. पण दोन्ही अमावस्येला सूर्य रासच बदलत नसेल तर महिन्याचं नाव तरी कसं बदलणार? अशावेळी त्याच महिन्याचं ना 'रिपिट' केलं जातं. यालाच महिना अधिक होणं असं म्हणतात. यासंदर्भातील श्लोक असा-

असंक्रान्तिमासोधिमासः स्फुटः स्यात
द्विसंक्रान्तिमासः क्षयाख्यः कदाचित

मायेचा निरास झाल्याशिवाय आपण ब्रह्माच्याजवळ जाऊ शकत नाही.

क्षयः कार्तिकादित्रये नान्यतः स्यात
तदा वर्षमध्ये धिमासद्वयंच

अर्थात ज्या चांद्र महिन्यात सूर्याचं एका राशीतून पुढील राशीत संक्रमण होत नाही, तो अधिकमास मानावा आणि ज्या चांद्रमहिन्यात सूर्य दोन राशींनी पुढे सरकतो त्या महिन्याला क्षयमास म्हणावं. अर्थात वरील नियमाप्रमाणं महिन्याचं नाव बदलणार नाही. थोडक्यात ज्या चांद्र महिन्यात सूर्य एका राशीतून दुसऱ्या राशीत भ्रमण करीत नाही तो महिना अधिक होय. जेव्हा महिना अधिक होतो तेव्हा अगोदरच्या महिन्याला अधिकाचा महिना तर नंतरच्या महिन्याला निज महिना म्हटलं जाते. साधारण तीन वर्षातून एकदा अशी परिस्थिती निर्माण होते. दोन अधिक महिन्यांत २७ ते ३५ महिन्यांचं अंतर असतं. पृथ्वीचा काल्पनिक अक्ष सूर्याशी लंबकोनातून नसून सव्वातेवीस अंशांनी झुकलेला असतो हे आपणाला माहिती आहेच. या झुकलेल्या अक्षामुळे मीन ते तूळ या राशी सूर्यापासून लांब असतात. अर्थात या राशींत सूर्याचा वेग मंदावतो. म्हणूनच फक्त फाल्गुन, चैत्र ते कार्तिक या नऊपैकीच एखादा महिना अधिक होत असतो. याउलट कार्तिक, मार्गशीर्ष, पौष यापैकी एखादा महिना क्षय होऊ शकतो. कारण सूर्यगती जास्त असते. माघ महिना मात्र अधिक किंवा क्षय शकत नाही. आपण बघितलं की एक चांद्रमासात जेव्हा सूर्याचं राशीभ्रमण होत नाही तेव्हा अधिक मास येतो. काही वेळा अशीही परिस्थिती येते की एकाच चांद्रमासात सूर्य दोन राशींनी पुढे सरकतो. अशा वेळी क्षयमास होतो. उदा. समजा मार्गशीर्ष महिन्यात सूर्य वृश्चिक राशीत आहे. मात्र त्या महिनाअखेरच्या अमावस्येला तो वृश्चिक व धनु ओलांडून मकरेत गेला आहे. आता धनु राशीत अमावस्या झालीच नसल्यानं पौष महिन्याचं नाव गाळावं लागेल. म्हणजेच पौष महिन्याचा क्षय होईल. ज्यावेळी क्षयमास होतो त्यावेळी क्षय मासाच्या अगोदर एक व नंतर एक असे दोन अधिक मास जवळजवळ होतात.

अधिकमासात सण घेत नाहीत. निजमासातच घेतले जातात. चैत्रातील गुढीपाडवा आणि ज्येष्ठातील गंगा दशहरा हे दोन सण मात्र यास अपवाद आहेत. ते अधिक महिन्यात सुद्धा तिथीप्रमाणे घेतले जातात. मात्र कोणत्याही चांगल्या कामासाठी अधिक मास शुभ नाही ते म्हणणं शास्त्राला धरून नाही. आपल्याकडे गैरसमज फार वेगानं आणि विचित्र प्रकारे पसरतात. उदाहरणच द्यायचं झालं तर पौष महिन्याचं देता येईल. पौषात रवि धनुत असतानाचा जो काळ आहे (साधारण १५ दिवस) फक्त तेवढाच आणि फक्त विवाहापुरता वर्ज्य सांगितला आहे. पण सर्वसामान्यांनी मात्र कोणत्याही कामासाठी संपूर्ण पौष अशुभ ठरवून टाकला आहे. अधिकमासाचंही तसं होऊ नये.

अधिक मासात नैमित्तिक कामे, देवाची पुनः प्रतिष्ठास्थापना, ग्रहणश्राद्ध, जातकर्म, नामकर्म, अन्नप्राशन, श्राद्ध आदी कर्मे करता येतात. मात्र गृहारंभ, वास्तुशांती, भूमिपूजन, पूर्वी कधीही न केलेली तीर्थयात्रा, विवाह, उपनयन, नव्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आदी करू नयेत, असे म्हटले जाते. हा महिना दानाचा असल्यानं गरिबांना अन्नवस्त्राचं दान, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं दान करावं. देवळे, धर्मादाय संस्था, सामाजिक संस्था यांना देणग्या द्याव्यात. आधुनिक काळाला शोभतील असे श्रमदान, विद्यादान, रक्तदान तसेच नेत्रदान-देहदानाचे फॉर्म भरणं असे उपक्रमही आखता येतील.

**– संजय पाटील**

दिवा प्रकाश देत नाही; प्रकाश आत्म्यातून दिसतो.

# भेट केंब्रिजच्या व्हिपल संग्रहालयाला

*श्री. सुधाकर आगरकर यांच्या प्रवास वर्णनातील व्हिपल संग्रहालयाच्या भेटीचे वर्णन या लेखात वाचावयास मिळते - संपादक*

प्राच्य विद्या संस्था, ठाणे (Institute for Oriental Study, Thane) भारतीय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करते. या शैक्षणिक सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन अशा तीन शहरांत त्यांचे वास्तव्य असते. या शहरातील संग्रहालये, वाचनालये, शैक्षणिक संस्था यांच्या भेटी आयोजित केल्या जातात. ही तीनही शहरे शैक्षणिकदृष्ट्या फारच प्रगतिशील आहेत. केंब्रिजबद्दल बोलायचे झाले तर केंब्रिज विद्यापीठ फारच प्रसिद्ध आहे. जगातील सर्वांत जास्त नोबेल पारितोषिक विजेते या विद्यापीठात आहेत. या विद्यापीठाचे वैशिष्ट्य असे की ते वेगवेगळे वस्तुसंग्रहालय चालवते. केंब्रिज शहरात विद्यापीठाने चालविलेले भूगर्भशास्त्र संग्रहालय, प्राणिशास्त्र संग्रहालय, प्राचीन इतिहास संग्रहालय, विज्ञान इतिहास संग्रहालय अशी अनेक संग्रहालये आहेत. यांतील जास्तीत जास्त संग्रहालयांना भेटी देण्याचा आमचा प्रयत्न असतो. विज्ञानात विद्यार्थ्यांना रस निर्माण व्हावा, त्यांच्या प्रगतीची त्यांना कल्पना यावी या दृष्टीने आम्ही विज्ञान इतिहास (History of Science) संग्रहालयाला भेट आयोजित करतो. त्या भेटीचा थोडक्यात आढावा या लेखात घेण्यात आलेला आहे.

ऑक्सफर्डच्या विज्ञान-इतिहास संग्रहालयाला आम्ही भेट दिली होती. तेव्हाच आम्हांला कोणीतरी सांगितले की केंब्रिजलादेखील असेच एक संग्रहालय आहे. त्यामुळे केंब्रिजमध्ये आल्यापासून या संग्रहालयाला भेट देण्याचे आमच्या मनात होते. पहिला संपूर्ण दिवस केंब्रिज टूरच्या बसने संपूर्ण शहरात फेरफटका मारण्यात गेला. दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही विद्यापीठ परिसरातून पायी फिरून आलो. त्यानंतर विज्ञान-इतिहास संग्रहालयाला जायचे असे आम्ही ठरविले. याचे कारण हे संग्रहालय उघडतेच मुळे १२.३० वाजता. तोपर्यंत आमची विद्यापीठ सहल आटोपली. त्यानंतर एका बागेत बसून आम्ही आपले डबे खाल्ले आणि जवळच असलेल्या माहिती केंद्रात गेलो. खरे तर हे विज्ञान-इतिहास संग्रहालय नेमके कोठे आहे याची आम्हांला चौकशी करायची होती. परंतु माहिती केंद्र इतके मोठे आहे आणि त्या ठिकाणी एवढ्या वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत की आमचा बराच वेळ तिथे गेला. चौकशीअंती असे कळले की माहिती केंद्राच्या जवळच संग्रहालय संकुल आहे. त्या संकुलात इमारतीच्या पहिल्या मजल्यावर हे संग्रहालय आहे. माहिती केंद्रातील व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार आम्ही फ्री स्कूल लेन (Free School Lane) मध्ये पोहोचलो. ही लेन म्हणजे अतिशय लहानशी बोळ आहे. या बोळीत आम्ही प्रवेश करणार, तेवढ्यात आमच्यापैकी एकाचे लक्ष गेले वर लावलेल्या फलकाकडे. त्यावर लिहिले होते व्हिपल विज्ञान-इतिहास संग्रहालय (Whipple History of Science Museum). आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो याचा आम्हांला आनंद झाला. स्वागत कक्षातील व्यक्तीची परवानगी घेऊन आम्ही आत गेलो.

विज्ञानाच्या प्रगतीने अनेक सामाजिक बदल घडून आले. म्हणूनच विज्ञान-इतिहास या विषयाचा पद्धतशीर अभ्यास करण्यात येतो. आपल्या देशात या विषयाला फारसे महत्व दिले जात नाही. परंतु पाश्चिमात्य देशांत या विषयासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आले आहेत. केंब्रिज विद्यापीठातदेखील विज्ञानाचा इतिहास आणि

सुख दुःख हेतूवर अवलंबून असते.

तत्त्वज्ञान विभाग (Department of History and Philosophy of Science) या नावाने स्वतंत्र विभाग आहे. संग्रहालयात जाण्यासाठी म्हणून आम्ही ज्या इमारतीत प्रवेश केला ती इमारत याच विभागाची आहे. या विभागात विज्ञानाच्या इतिहासाचा आणि तत्त्वज्ञानाचा पद्धतशीर अभ्यास केला जातो. येथे काम करणाऱ्या मंडळींच्या उपयोगासाठी म्हणून हे संग्रहालय उभारलेले आहे. रॉबर्ट व्हिपल नावाचे एक संग्रहप्रेमी गृहस्थ होते. केंब्रिज शहरातील विज्ञान उपकरण कंपनी (Cambridge Scientific Instrument Company) या कंपनीचे ते संचालक होते. आपल्या संग्रहालयातील जवळपास २००० जुनी उपकरणे त्यांनी विद्यापीठाला दिली. त्यांच्या मदतीने विद्यापीठाने १९४४ मध्ये या संग्रहालयाची स्थापना केली. रॉबर्ट व्हिपल यांच्या दानशूरपणाचे प्रतीक म्हणून या संग्रहालयाला व्हिपल विज्ञान इतिहास संग्रहालय असे नाव दिले गेले.



**संग्रहालयाचे प्रथमदर्शनी दिसणारे दृश्य**

विद्यापीठात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी प्रयोगशाळा म्हणून या संग्रहालयाचा उपयोग होतो. असे जरी असले तरी बाहेरून येणाऱ्या व्यक्तींचे येथे स्वागत केले जाते. आपण जेव्हा संग्रहालयात प्रवेश करतो तेव्हा संग्रहालयाची रचना कशी आहे याची माहिती देणारे पत्रक आपल्याला दिले जाते. शालेय विद्यार्थ्यांसाठी येथे खास व्यवस्था आहे. आपण जर आधी कळविले तर संग्रहालयाची सफर ते आयोजित करतात. या सफरीत एक मार्गदर्शक सतत आपल्यासोबत असतो. याखेरीज जुन्या वस्तू व उपकरणे हाताळण्याची किंवा त्यांचा उपयोग करून प्रयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. आम्ही आधी वेळ ठरविली नव्हती; त्यामुळे या सुविधा आम्हाला मिळाल्या नाहीत. तरीही एका मार्गदर्शकाने आम्हांला तेथे असलेल्या वस्तूंची चांगली माहिती दिली. उपकरणांना हात लावायची आणि ते हाताळण्याची मुभा असल्याने विद्यार्थ्यांनी या भेटीचा चांगलाच आनंद घेतला. संग्रहालय पहिल्या मजल्यावर आहे. जिना चढून आम्ही वर गेलो. दार उघडून प्रवेश करताच आम्ही मुख्य दालनात (Main Gallery) पोहोचलो. या दालनात आकाश निरीक्षणासाठी वापरावयाची यंत्रे ठेवलेली आहेत. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये आकाशाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची जणू स्पर्धाच चालली होती. त्यामुळे खगोलशास्त्रात खूप प्रगती झाली. विल्यम हर्शलने त्या काळात एक चांगला दूरदर्शी (Telescope) बनविला होता. तेच उपकरण येथे ठेवलेले आहे. याखेरीज त्या काळात वापरले जाणारे अस्ट्रोलोब्स (Astrolobs) आणि झाइट्रोपस (Zaetropes) मोठ्या संख्येने तेथे ठेवलेले आहेत. यांतील बऱ्याच वस्तू ब्राँझच्या आणि पितळेच्या आहेत. हे दोन्ही मिश्रधातू खराब होतात. परंतु वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या वस्तू मात्र चकचकीत आहेत. त्यांची देखभाल चांगली ठेवली जाते, याचे प्रत्यंतर आपल्याला जागोजागी येते.



**खगोलीय संशोधनासाठी लागणारे धातूचे साहित्य**

मुख्य दालनातील वस्तू बघत बघत आपण प्रवेश करतो ते डिस्कव्हर (Discover) नावाच्या दालनात. येथे आपण नवीन माहिती मिळवू शकतो. त्यासाठी कपाटातील पाहिजे त्या वस्तू काढून घेता येतात. त्याहीपेक्षा महत्वाची गोष्ट म्हणजे तेथे अनेक टेबलं ठेवलेली आहेत. या टेबलाला अनेक खण आहेत. पहिला खण उघडताच एक प्रश्न आपल्यापुढे येतो. त्या प्रश्नाचे उत्तर सापडण्यासाठी त्याच्या खालचे खण उघडावे लागतात. एकाच खणात उत्तर सापडेल असे नाही. कधीकधी एखाद्या खणात सूचना आढळते त्याप्रमाणे शोध घ्यावा लागतो किंवा कृती करावी लागते. येथे माहिती शोधणे म्हणजे एक करमणुकीचा कार्यक्रम असतो. आपल्याला या जुन्या पद्धतीने जर माहिती मिळवायची नसेल तर जवळच संगणक ठेवलेला आहे. हा संगणक माहितीच्या महाजालाला जोडलेला आहे. त्याचबरोबर विज्ञान इतिहासाची इत्थंभूत माहिती संगणकाच्या हार्डडिस्कवर ठेवलेली आहे. तेथून पाहिजे ती माहिती आपल्याला मिळविता येते. या दालनात खरे तर संपूर्ण दिवस घालविता येईल. परंतु आम्हांला दुसऱ्या संग्रहालयात जायचे असल्याने येथून लवकर बाहेर पडायचे होते. त्याआधी वरच्या मजल्यावरचे आणखी एक दालन पाहायचे होते.

वरच्या मजल्यावर जाण्यासाठी आम्ही लिफ्टने जाऊ लागलो तेव्हा आमची नजर रिझर्व गॅलरी (Reserve Gallery) या फलकावर पडली. आम्ही चौकशी केली असता आम्हाला सांगण्यात आले की या दालनात विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. त्यासाठी आधी सूचना द्यावी लागते. आठवड्याच्या ठरावीक दिवशी आणि ठरावीक वेळी विद्यार्थ्यांसाठी वेळ राखून ठेवलेला असतो. त्यावेळेस विद्यापीठाच्या विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी येतात आणि शालेय विद्यार्थ्यांना विज्ञानाचा इतिहास स्पष्ट करून सांगतात. शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यापीठाच्या हा प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहे. असेच प्रयत्न विद्यापीठाचे इतर विभाग करतात असे आम्हांला कळले.



**विद्यार्थ्यांसाठी निर्माण केलेला संशोधन विभाग**

लिफ्ट घेऊन आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. हे दालन विद्यापीठातील विविध कॉलेजने विज्ञानाच्या क्षेत्रात कोणते काम केले याची माहिती देतात. यात भर आहे जुन्या कामावर. १८ व्या, १९ व्या शतकांत वेगवेगळ्या कॉलेजमध्ये कोणते काम चालू होते, त्याचे निष्कर्ष काय याची संपूर्ण माहिती येथे दिलेली आहे. या दालनाचा फेरफटका मारल्यानंतर केंब्रिज विद्यापीठाने विज्ञानाच्या प्रगतीत कसा हातभार लावला, याची चांगली कल्पना येते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा
वैभव नगरी, कल्याण शीळ रोड
काटई ता. कल्याण
जि. ठाणे– ४२१२०४

●●●

## महायोगी श्री अरविंदांच्या समाजशास्त्रीय विचारधारेवर आधारित

लेखांक-५

*योगी श्री अरविंदांच्या संबंधातील लेखमालेतील पुढील लेख - संपादक*

मागील लेखांत लोकशाही व्यवस्था आणि साम्यवादी व्यवस्था कशा पद्धतीने अयशस्वी ठरल्या ते आपण पाहिले. साम्यवादी विचारधारा तर आता पुस्तकांत बंदिस्त होऊन पडली आहे. लोकशाही अजूनही या ना त्या पद्धतीने राबवली जात आहे. तथापि व्यक्तिवादी युगाची सुरुवात होत असताना मानवाच्या रॅशनल मनाने जन्म दिलेल्या आणि आदर्शभूत मानल्या गेलेल्या स्वातंत्र्य समता आणि बंधुत्व या तीन थोर तत्त्वांची खऱ्या अर्थाने प्रस्थापना होणे अवघड ठरले हे नाकारता येणार नाही. पण मग प्रश्न असा निर्माण होतो की मानवाच्या बौद्धिक विचारशक्तीने निर्माण केलेल्या या व्यवस्था आपल्या अंतिम ध्येयाप्रत का जाऊ शकल्या नाहीत?

श्री अरविंदांनी या मूलभूत प्रश्नाचा वेध घेताना मुळात मानव म्हणजे कोण, त्याचे समाजातील आणि साऱ्या विश्वातील स्थान काय. त्यांचे परस्पर संबंध काय, पूर्व जीवनाचा अजून कोणता प्रभाव त्याच्या वागणुकीत दिसतो, मानवी मन आपली प्रगती कशा पद्धतीने साधते. बौद्धिक विचार शक्तीच्या मर्यादा कोणत्या; संस्कृती, सौंदर्यवाद, धर्म, विज्ञान यांचा त्याच्या मानसिकतेवर कोणता प्रभाव पडतो, आणि शेवटी आध्यात्मिकतेकडे जाण्याची आवश्यकता का आहे इत्यादी अनेक विचारांचा सखोल उहापोह केला आहे. या विचारांचा Canvas इतका विशाल आणि त्याचबरोबर इतका सूक्ष्म आहे की त्यावर एका दृष्टिक्षेपात नजर ठरत नाही. तरीपण वरील मुद्द्यांच्या संदर्भात अस्तित्व आणि त्याच्याशी जोडून असणाऱ्या सामाजिक प्रगतीच्या नियमांकडे एक नजर टाकणे आवश्यक आहे.

आधुनिक विज्ञानाने मानवाच्या शारीरिक आणि प्राणिक उत्क्रान्तीचा भूतकाळ शोधून काढला आणि पुरेशा पुराव्यांसह तपशीलवार आजतागायतच्या काळापर्यंत आणून ठेवला. पण या खटाटोपाने मानवाच्या अथवा मानवी समाजाच्या अस्तित्वाचे उद्दिष्ट स्पष्ट झालं नाही. मनाच्या मातळीवर आलेला माणूस प्रकृतीच्या सर्वसाधारण नियमांना अनुसरून स्वतःची प्रगती साधतो, मानवी-समाजाच्या नियमांना अनुसरुन स्वतःची प्रगति साधतो, पण त्याशिवाय तो स्वतःच्या वैयक्तिक नियमांना अनुसरुन प्रगती साधतो. ही प्रगती साधत असताना तो स्वतःच्या मनाच्या पलीकडे झेप घेऊ लागतो. आणि या प्रयत्नांतच त्याला उमगतं की त्याचं अस्तित्व स्वतंत्र नाही. तो या वैश्विक पसाऱ्याचा एक भाग आहे. मुळातच हे अस्तित्व अमर्याद आहे. ते असं एक वैशिष्ट्यपूर्ण सत्य आहे की जे असंख्य अशा पैलूतून प्रगट होत असतं. या प्रगटीकरणातून असा नियम निर्माण होतो की सर्व गोष्टीचा उगम एकाच गोष्टीतून झाला आहे. सर्वांच्या अस्तित्वाचा नियम एकच आहे. सर्व गोष्टी परस्पर संबंधांवर अवलंबून आहेत. मात्र सर्वांच्या समान उद्दिष्टाची जाणीव प्रत्येकाला आपापल्या परीने होत असते आणि प्रत्येकात होणाऱ्या बदलाने हे विश्व समृद्ध होते. अशा प्रकारचा विचार जेव्हा मानवाला प्राप्त होतो तेव्हा तो Rational पातळीवरुन Supra-Rational पातळीकडे वाटचाल करत असतो. स्वतःचे प्रश्न, इतरांचे प्रश्न, सामाजिक प्रश्न यांकडे तो आता वेगळ्या भूमिकेतून पाहू लागतो. जीवनाचा हेतू समजल्याने प्रश्न सोडवण्यासाठी संघर्षाची गरज नाही, समन्वयाची गरज आहे हे त्याला पटलेले असते. आपल्या जीवनाचा कायदा

आणि त्यांतील सत्य समजण्यासाठी जे जीवन ज्याच्याशी जोडलेले आहे त्या विश्वाचा कायदा आणि त्यातील सत्य समजण्यासाठी तो प्रयत्न करु लागतो. याचं प्रक्रियेतून त्याला जाणवतं की त्याचं शरीर, मन व जीवन ज्यापासून निर्माण झालेलं असतं त्या चिरंतन तत्त्वाला जाणून घेणं हाच मानवाच्या वैयक्तिक व सामाजिक अस्तित्वाचा हेतू आहे. आणि हा हेतू साध्य करण्यासाठी त्याला जशी परमेश्वरी कृपेची गरज असते. त्याचप्रमाणे त्याच्या सभोवती असणाऱ्या निसर्गातील दैवी अंशाचीही मदत लागते. त्याला भेटणारा प्रत्येक माणूस हा साथ देऊन अथवा विरोध करून त्याला ही प्रगती करण्यास मदत करत असतो. तसेच प्रत्येक व्यक्ती जी प्रगती साधत असते ती प्रगती केवळ त्याची नसते तर संपूर्ण समाजाची असते, संपूर्ण मानवतेची असते. असा दृष्टिकोन जेव्हा प्राप्त होतो तेव्हा संघर्षाची जागा समन्वय घेतो; रोष किंवा द्वेष नाहीसा होऊन प्रेम निर्माण होतं.

परंतु सर्वसाधारणपणे रॅशनल पातळीवर गेलेला माणूस अथवा समाज जीवनाच्या या हेतूकडे दुर्लक्ष्य करतो किंवा त्यास तो हेतू उमगत नाही. स्वतःच्या 'इगो' च्या प्रभावाखाली असल्याने तो आपल्या खऱ्या 'स्व'ला ओळखत नाही. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात आपला स्वार्थ आणि महत्वाकांक्षा यांना प्राधान्य देतो. एखादा समाज अथवा एखादे राष्ट्रसुद्धा याच पद्धतीने आपल्या "Communal Ego" वर स्वार होऊन इतर राष्ट्रांना ओरबाडू लागते वैयक्तिक किंवा सामाजिक, राष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थेमध्ये जेव्हा काही प्रश्न निर्माण होतात तेव्हा असा मानव अथवा समाज आपल्या बौद्धिक विचारशक्तीच्या माध्यमातून त्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करतो. समाज अथवा राष्ट्र ही एक जिवंत वस्तू आहे. त्यांनाही आत्मा आहे. त्यांच्या प्रगतीचा एक हेतू आहे हे तो जाणत नाही. समाजाकडे अथवा राष्ट्राकडे किंबहुना त्यांच्या व्यवस्थेकडे तो एक यंत्र म्हणून पाहतो. आणि आपल्या बौद्धिक विचारशक्तीच्या माध्यमातून दुरुस्त्या करत राहतो. मानवी जीवनाच्या प्रश्नांची उत्तरं बौद्धिक विचारशक्तीतून मिळणार नाहीत तर त्यासाठी आध्यात्मिक प्रवृत्तीचा आधार अपरिहार्य आहे.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व ही अत्यंत महान अशी तत्त्वे आहेत. मानवाच्या बौद्धिक विचारशक्तीने निर्माण केलेल्या व्यवस्था या तत्त्वांची प्रस्थापना करण्यास असमर्थ ठरल्या. कारण मुळात ही सर्व तत्त्वे म्हणजे आत्म्याची गुणवैशिष्ट्ये आहेत. आणि म्हणून आत्म्यास प्राधान्य द्यायला हवे. बाह्य स्वातंत्र्य नव्हे तर केवळ आंतरिक स्वातंत्र्यच परिपूर्ण अशी मानवी व्यवस्था निर्माण करू शकेल. मानवाचा स्वार्थ आणि आसुरी महत्वाकांक्षा यांतून निर्माण होणारी फाटाफूट जर हद्दपार करायची असेल; आणि खरीखुरी आंतरिक समता निर्माण करायची असेल तर आध्यात्मिकतेकडेच वळावे लागेल. प्रत्येक व्यक्तीच्या अस्तित्वाचा, त्याच्या आत्म्याचा उगम एकाच तत्त्वामधून झाला आहे अशी जाणीव जर निर्माण झाली तरच खराखुरा बंधुभाव निर्माण होईल.

परंतु हे साध्य होण्यासाठी 'रॅशनल' पातळीवरील मानवाला 'सुप्रा-रॅशनल' पातळीच्या दिशेने वाटचाल करावी लागेल. त्याच्या बौद्धिक विचारशक्तीची (Reason) जागा Intuitive Knowledge घेईल. संपूर्ण समाजाची वाटचाल Individualistic युगाकडून प्रथम Subjective युगाकडे व्हावी लागेल. आणि श्री अरविंदांनी म्हटल्याप्रमाणे याच वाटचालीतून मानवाला त्याच्या 'स्व'त्वाची जाणीव होईल.

अशा प्रकारच्या अध्यात्मिक परिवर्तनाशिवाय मानवते पुढे दुसरा पर्याय नाही हे स्पष्ट करतान श्री अरविंद म्हणतात– "No machinery invented by reason can perfect either the individual or the collective man, an inner change is needed in man."

---

जो स्थिर नाही, त्याला योग शिकून काय करायचे?

केवळ हाच एक मार्ग आहे असे ठासून सांगितल्यावर ते पुढे सांगतात की मानवतेस हे जमले नाही तर ज्याप्रमाणे प्राणी जगताची उत्क्रान्ती होऊन मानवता निर्माण झाली. त्याचप्रमाणे मानवापेक्षा श्रेष्ठतर असणाऱ्या महामानवाची निर्मिती उत्क्रान्तीच्या माध्यमातून होण्याची मानवतेस वाट पहावी लागेल. ही अपरिहार्यता जरी त्यांनी स्पष्टपणे मांडली असली तरी पूर्णयोगाच्या माध्यमातून मानवाला आपले आध्यात्मिक परिवर्तन घडवून आणता येईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

**श्री ऑरोबिन्दो आश्रम, पाँडिचेरी**

अशा प्रकारचे आध्यात्मिक परिवर्तन घडून येणे शक्य आहे का? आणि तेणेकरुन स्वातंत्र्य, समता, बंधुभाव ही तत्त्वे प्रस्थापित होऊ शकतील का असा प्रश्न निर्माण झाल्यास श्री अरविंद आश्रम, पाँडिचेरी, हे त्यास उत्तर असेल.

पाँडिचेरी येथील श्री अरविंद आश्रम म्हणजे श्री अरविंदांच्या व माताजींच्या विचारांचे, आदर्शाचे एक नैसर्गिक आणि वृद्धिंगत झालेले मूर्त स्वरुप.



**श्री ऑरोबिन्दो आश्रम, पाँडिचेरी**

आश्रम म्हटला की सर्वसामान्य माणसाला दूर कुठे तरी एकांतात असणारा, बंदिस्त आवारातला एखादा मठ आठवतो. भगवी वस्त्र धारण केलेले जपजाप्यामध्ये मग्न असणारे संन्यासी दिसू लागतात. नित्यनेमाने चालणाऱ्या पूजा, अर्चा, होम-हवन, कीर्तन, प्रवचन आणि भजनांचा गजर अथवा ठरावीक वेळी चालणारा वेदमंत्रांचा घोष हे सारं डोळ्यासमोर येतं आणि त्यामुळे साधा पोशाख करून काम करणारा एखादा विक्रेता, महाविद्यालयात शिकवणारा एखादा प्राध्यापक अथवा एप्रन घालून काम करणारा एखादा तंत्रज्ञ हे सारे पूर्णयोगाचे साधक आहेत अस समजलं तर त्या सर्वसामान्य नवख्या माणसाचं मन गोंधळून जातं.

असा हा आगळावेगळा पाँडिचेरीचा आश्रम. पं. सातवळेकर शास्त्रींनी जेव्हा या आश्रमास भेट दिली तेव्हा ते म्हणाले की वेदकाळानंतर या पृथ्वीवर असा प्रयोग प्रथमच केला जात आहे. कोणता होता तो प्रयोग? मानवाच्या Conciousness मध्ये बदल घडवून आणण्याचा आणि त्या दिशेने प्रयत्न केल्यावर काय साध्य होणार होतं?

आश्रमाच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक महत्वाचं वैशिष्ट्य हे की आश्रमातील साधकांना पूर्णपणे आंतरिक स्वातंत्र्य आहे. प्रत्येकाने आपापली प्रगती आपापल्या इच्छेने आपआपल्या पद्धतीने साधावी हा प्रगतीचा मूलभूत नियम आणि म्हणूनच येथे आपापली साधना कशी करावी, कोणत्या मार्गाने करावी त्याचे साधकांना पूर्ण स्वातंत्र्य आहे.

तसेच आश्रमांत खरीखुरी समता प्रस्थापित झालेली आपल्याला दिसून येते. जात, धर्म, वंश, श्रीमंत, गरीब असा कोणत्याही प्रकारचा भेदाभेद येथे केला जात नाहीच पण त्याशिवाय तेथे स्त्री-पुरुष असा सुद्धा भेद केला जात नाही. प्रत्येक व्यक्तीकडे एक आत्मा म्हणून पाहिलं जातं. पं. सातवळेकरांच्या जेव्हा ही गोष्ट ध्यानात आली तेव्हा त्यांना ती कौतुकास्पद वाटली आणि ते म्हणाले, ''माताजी तर येथे शुद्ध आध्यात्मिक समाजाची निर्मिती करत आहेत.

वेदांप्रमाणे आत्म्याच्या दृष्टीने स्त्री-पुरुष असा भेद नाही. स्त्रीची खरी प्रगती मला येथे दिसली.''

आश्रमात प्रत्येक साधकाला एखादे काम नेमून दिलेले असते. प्रत्येकाने आपले काम हे एक ईश्वरी कार्य आहे असे मानून आणि हे कार्य करत करत आपली प्रगती साधली जाणार आहे हे ध्यानांत ठेवून; निष्ठेने आणि प्रेमाने करावे अशी अपेक्षा असते. सर्वजण याच पद्धतीने काम करत असल्याने कुठेही 'बॉसिंग'ची गरज नसते. परस्परांमध्ये स्पर्धा नसते, संघर्ष नसतो, मत्सर नसतो आणि यामुळेच स्वातंत्र्य आणि समतेबरोबर आंतरिक बंधुभाव निर्माण होतो. एकत्वाची आणि प्रेमाची भावना बळावू लागते. कारण प्रेम म्हणजे आपल्या अंतरंगातील आत्म्याला दुसऱ्याच्या अंतरंगातील आत्म्याची ओढ वाटणे तर एकत्व हे अनेकांच्या आत्म्याशी जोडलेले असते. माणूस आध्यात्मिक बनू लागला की या भावना जागृत होतात हे श्री अरविंदांनी 'सावित्री' या काव्यात खालील ओळीतून स्पष्टपणे सांगितले आहे.

And love is a yearning of the One for the One
And oneness is the soul of multitude

आश्रमातर्फे चालविल्या जाणाऱ्या श्री अरविंद आंतरराष्ट्रीय शैक्षणिक केन्द्रातील विद्यार्थ्यांनाही लहानपणापासून समतेचे, बंधुत्वाचे शिक्षण दिले जाते. या शिक्षण संस्थेमध्येही विद्यार्थी-विद्यार्थीनी असा कोणताही भेदभाव केला जात नाही. संपूर्ण समता तर असतेच पण संपूर्ण मावतेशी बंधुत्वाची भावना निर्माण व्हावी हे उद्दिष्ट समोर ठेवूनच शिक्षण दिले जाते. या संस्थेच्या उद्दिष्टांपैकी खालील २ उद्दिष्टे या दृष्टिकोनातून वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

1) To devlope the sense of oneness mankind and international collaboration.
2) To prepare for the role that India has to play in the formation of the new international harmony.

तथापि अध्यात्मिकतेच्या दिशेने जाण्यासाठी आलेले साधक आणि श्री अरविंद व माताजी यांच्या Conciousness ने भारून टाकलेल्या वातावरणात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यामध्ये अशा प्रकारचा बदल अपेक्षित ठरतो. मात्र बाह्य जगात हे शक्य होईल का असा प्रश्न कुणाच्याही मनात निर्माण होईल.

**ऑराव्हिले अथवा उषानगरी**

याच दृष्टिकोनातून माताजींनी ऑरोविलेचा प्रकल्प सुरू केला आणि त्यांच्याच आशीर्वादाने तो साकार झाला. श्री अरविंद आश्रमाचे स्वरूप हे योगाश्रमाचे आहे. पण त्याच योगयुक्तस्थितीचा बाह्य जगात कसा आविष्कार व्हावा त्याचे प्रात्यक्षिक म्हणजे पुण्यवान नगरी-ऑरोव्हिले.



**ऑराव्हिले अथवा उषानगरी**

माताजींनी एक स्वप्न पाहिलं होते. जागाच्या पाठीवर असं एखाद स्थळ असावं की जेथे कोणतंही राष्ट्र आपला अधिकार गाजवणार नाही. सर्वोच्च सत्याच्या एकमेव सत्तेचेच तेथे आज्ञा पालन केले जाईल. जगातील कोणत्याही राष्ट्राचा, कोणत्याही धर्माचा, कोणत्याही वंशाचा माणूस तेथे जाऊन मुक्तपणे राहू शकेल. शांती, एकवाक्यता आणि सुसंवाद हे तेथील ब्रीदवाक्य असेल.

प्रत्येक माणसात लढाऊ वृत्ती असते. पण त्या वृत्तीचा उपयोग इतरजणांशी लढण्याऐवजी आपणातील अज्ञान आणि दुःख शोकाचे मूळ कारण यांवर मात करण्यासाठी केला जाईल. या ठिकाणी काम हे केवळ उपजीविकेचे साधन असणार नाही तर आत्मप्रगटनाचे आणि स्वतःच्या क्षमता विकसित करण्याचे साधन असेल. स्पर्धा आणि संघर्ष यात गुंतलेले मानवी मन या ठिकाणी काहीतरी चांगले निर्माण करण्याच्या चढाओढीत, सहकार्यात आणि बंधुभावात गुंतलेले असेल.

१९६६ साली, माताजींची उषानगरीची ही संकल्पना, सर्व राष्ट्रांनी युनेस्कोच्या बैठकीत उचलून धरली. यामुळे आंतरराष्ट्रीय सुसंवाद व शांती प्रस्थापित होण्यास मदत होईल असे सर्वांचे मत पडले.

२८ फेब्रुवारी १९६८ रोजी या उषानगरीच्या पायाभरणीचा प्रारंभ झाला. जगाच्या इतिहासातील हा एक चिरस्मरणीय असा प्रसंग होता. खऱ्याखुऱ्या मानवी भ्रतृत्वाचा (Fraternity) आणि एकत्वाचा (unity) अनुभव नित्य जीवनात उतरवण्याचा जो महान उद्देश; त्याच्या सिद्धीसाठी भौतिक व आध्यात्मिक साधनसंभार जमवण्याचे काम ही नगरी करील असे या नगरीच्या जाहीरनाम्यांत म्हटले आहे. जवळ जवळ २५/३० निरनिराळ्या देशातील २५०० लोक आज या नगरीत वास्तव्य करुन वरील आदर्श प्रत्यक्षात उतरवीत आहेत. अशा तऱ्हेने आध्यात्मिक जीवनाच्या माध्यमातून स्वातंत्र्य-समता-बंधुभाव ही मानवी जीवनातील महान तत्त्वे प्रस्थापित करता येतात हे श्री अरविंद आणि माताजींनी साऱ्या जगाला दाखवून दिले.

मानवी समाजाची चक्राकार पद्धतीने होणारी प्रगती, या प्रगतीचे मूलभूत नियम, मानवी संस्कृतीसमोरील आदर्श, ते आदर्श प्रस्थापित करण्यासाठी मानवाची चालू असलेली धडपड, त्यात येणारे अपयश, त्या अपयशाची कारणे आणि शेवटी ते आदर्श प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग या सर्वांचा उहापोह श्री अरविंदांनी त्यांच्या समजाशास्त्रीय विचारधारेत केला आहे. या सर्व विचारांचा Canvas इतका विशाल आहे की तो आपल्या दृष्टीत पकडता येत नाही. त्यांतील सूक्ष्मता जाणून घेताना बुद्धी कुंठित होते. तरीही त्यांतील काही विचारांच वैशिष्ट्यपूर्ण अस दर्शन जे मला घडल ते माझ्या कुवतीप्रमाणे देण्याचा जो प्रयत्न केला तो केवळ एकच हेतू मनात बाळगून की त्यामुळे श्री अरविंदाचे विचार मुळातून वाचावे अशी इच्छा प्रत्येकाच्या मनात निर्माण व्हावी.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## श्रद्धांजली

आमच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य शंकर कृष्णाजी आपटे यांचे अलीकडे निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. प्राचार्य आपटे यांचा गणित हा विषय होता व ते अतिशय विद्यार्थी प्रिय होते. ते या महाविद्यालयात सुरुवातीस गणि विभाग प्रमुख व नंतर उपप्राचार्य होते. १९८० ते १९९४ या काळात त्यांनी प्राचार्यपदाची धुरा सांभाळली.

प्रवासाची अतिशय आवड, सदा हसतमुख चेहरा, वाचन ही त्यांची काही वैशिष्ट्ये होती.

त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

- संपादक

# श्रीमत् भगवद्गीता - विषय प्रवेश

*दिशाचे व्यासंगी लेखक शंकरराव मठ यांच्या गीतेवरील लेखांची मालिका या अंकापासून सुरु करत आहोत-संपादक*

## निवेदन

गीतेवर अनेक ग्रंथ व विपुल लिखाण उपलब्ध असून हजारो गीताभ्यासी लोक त्या सर्वांचा यथेच्छ उपयोग करत आहेत. गीता ग्रंथ समजावून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

'मी' देखील त्या अभ्यासकांपैकीच एक आहे. मी अनेक ग्रंथ अभ्यासिले. टिपणे काढली, माझ्या कुवतीप्रमाणे दोन तीन वेळा संपूर्ण गीता निरनिराळ्या संस्थांतील लोकाना त्यांच्या विनंतीवरुन शिकविली. काही लेख लिहिले. आज ही गीतेवरील लेखमाला प्रकाशित करण्याचा एकच हेतू, अभ्यास करणाऱ्या गीता प्रेमी लोकांना मदत व्हावी, कारण या लेखमालेची योजनाच तशी आखली आहे. हा एक अभ्यास प्रकार आहे.

**या लेख मालेतील वैशिष्ट्य :**

- संपूर्ण गीतेचे अध्यायवार विवेचन केले आहे. गीतेत आलेले विषय, यावरील श्लोक समूहांचा एकत्र गोषवारा दिला आहे.
- तसेच प्रत्येक अध्यायाच्या शेवटी-अध्यायात कोणत्या विषयावर उहापोह केला आहे. त्याचे विवरण केले आहे. या शिवाय सौख्य आदि संबंधी विस्तारपूर्वक माहिती दिली आहे. तसेच काही पारिभाषिक शब्दांचा अर्थही त्या त्या अध्यायाच्या शेवटी दिलेला आहे.
- या लेख मालेत नवीन काही नाही. केवळ अभ्यासकांना उपयुक्त माहिती मिळावी हा हेतू मनात ठेवून हा प्रपंच केला आहे. माझ्या परीने हा एक प्रयत्न आहे. अनेकांना त्याचा उपयोग होईल अशी ही कल्पना आहे.
- या लेख मालेतील बरीच उपयुक्त माहिती निरनिराळ्या ग्रंथातून असलेली आढळेल. ती आवश्यक माहिती अभ्यासकांना या लेखमालेत समाविष्ट केलेली आढळेल.
- अनेक मान्यवर लेखकांचे तसेच ग्रंथ कर्त्यांचे मी ऋण मान्य करतो. त्यांनी योग्य प्रकारच्या विचारांची मांडणी करून गीता अभ्यासाला चालना दिलेली आहे. या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे.

हा प्रयत्न अभ्यासकांना उपयुक्त ठरो ही सदिच्छा!

**- शं. बा. मठ**

---

जो अनुभव घेतो त्याला गुरु म्हणता येतं.

### १) गीता ग्रंथ :

गीतेचे तत्त्वज्ञान आज पाच हजार वर्षे उलटली तरीही जगाला मार्ग दाखवीत राहिले आहे आज जगाला त्याची जितकी गरज आहे. तितकी गरज क्वचितच कधी भासली असेल. हे तत्त्वज्ञान नित्य नूतन आहे. कधी जुने होत नाही. अशा अद्‌भुत ग्रंथाविषयीदेखील आम्ही उदासीन आहोत. श्रीकृष्णाने जगाला मार्गदर्शन करण्यासाठी, तत्त्वज्ञान समजावण्यासाठी गीता सांगितलेली आहे. त्यातील तत्त्वज्ञान इतके श्रेष्ठ आहे की आज जगातील सर्व धर्म ग्रंथांत व तत्त्वज्ञानाच्या ग्रंथात तिला अग्रस्थान प्राप्त झालेले आहे. गीता दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञान मार्गदर्शन करायला उभी आहे.

**शिकवण** : समतोल जीवन निर्माण करण्याची प्रेरणा प्राप्त होते. सर्वांनाच दैनंदिन व्यवहार उन्नत व उदात्त करता येतात. मी परमात्म्याचा सेवक असून हातून घडणारे प्रत्येक कर्म ही त्याची पूजा होय. यातून कल्याण साधता येते. गीतेचा दृष्टिकोण व्यापक, उदार स्वरूपाचा आहे. केवळ एकट्याने कल्याण साधून न थांबता सामाजिक कल्याणही साधावे. विशुद्ध चारित्र्य, सद्‌गुण संपन्न जीवन, आत्यंतिक कुशलतेने कर्म करण्याची हातोटी, या गोष्टीने विश्वात सौख्य निर्माण करता येईल. आपले स्वतःचे जीवन सर्व बाजूंनी फुलविता येईल. धर्म–व्यवहार, श्रद्धा–बुद्धी, नीती–तत्त्वज्ञान, ध्येय–व्यवहार, ऐहिक–पारलौकिक या सर्वांचा मेळ घालून जीवन



**श्रीकृष्ण अर्जुनाला गीता उपदेश करताना**

सर्वांगीण व सर्वकष बनवता येईल, असे प्रतिपादन करणारा हा ग्रंथ आहे.

प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्या मधील झोंबाझोंबी अनादीकालापासून चाललेली आहे. जेव्हा प्रवृत्ती व निवृत्तीमधे समन्वय घडतो तेव्हाच मानवाला समाजाच्या विकासाची उंची गाठता येणे शक्य होते. केवळ निवृत्तीवादी वा केवळ प्रवृत्तिवादी व्यक्ती अथवा समाज, विकास करू शकत नाहीत. विकास हा समन्वयानेच साधता येतो.

श्रीकृष्णाने गीतेत हेच तत्त्व सांगितले आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होता कामा नये. हाच खरा विकासाचा मार्ग. मानव हा मार्ग स्वीकारून चिरकाल उन्नती साधू शकतो. अशा विकासाकरता योग्य मार्गदर्शक ग्रंथ म्हणजे तो एकमात्र गीता ग्रंथ होय.

**२) वैज्ञानिक दृष्टी**

सत्यान्वेषण हा हेतू साधण्यासाठी वैज्ञानिकांत प्रखर बुद्धि निष्ठा व तर्क कठोरता असावी लागते. वैज्ञानिक वस्तुनिष्ठ असतो. प्रत्येक गोष्ट तपासून घेईल, त्यावर प्रयोग करील, कुणाच्या मतावर अवलंबून न राहता प्रयोगांतून जी काही प्रतीती येईल त्याचा तो स्वीकार करतो. अर्जुनाच्या ठिकाणी ही दृष्टी होती. गीता ऐकण्यापूर्वी विशिष्ट विचार त्याच्या मनात होते. कृष्ण वचनाने त्याचे मन ढळले नाही. त्याचे समाधान झाले नाही. वारंवार प्रश्न विचारून तपासून पाहण्याचा प्रयत्न झाला. परंतु हा सारा शब्दांचा फुलोरा आहे असे त्याला वाटले. विश्वरूप दर्शनाने त्याच्या मनातील साऱ्या शंका दूर झाल्या. मगच श्रीकृष्ण वचनाचा त्याने स्वीकार केला.

**३) बुद्धियोग**

कर्म बंधनातून मुक्त होण्याची मुक्ती म्हणजे बुद्धि योग. एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रुणु। बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंध प्रहास्यसि। (२.३९) बुद्धीच्या कक्षा रुंदावयास पाहिजेत. बुद्धी दैवी गुणाच्या आधारे प्रवर्तित व्हावयास हवी. वेद, गुरू, विद्वान् हे सर्व केवळ मार्गदर्शक होत. याच्या पलीकडे ज्याचा त्याला प्रवास करावा लागतो. इदं ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया। विमृश्य अतत् अशेषेण यथेच्छसि तथा कुरु। (१८-६३). श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात- पार्था तुला साधकबाधक ज्ञान सांगितले आहे. त्याचा तू विचार कर व तुला योग्य वाटेल तसे वाग.

**४) गीतेची शिकवण सार्वजनीन व सार्वकालीन**

गीतेतील शिकवण अति व्यापक आहे. स्थल कालातीत आहे. अखिल भूतमात्राचे कल्याण गीतेला अभिप्रेत आहे. सर्व कर्म यज्ञमय करावे ही गीतेतील मुख्य शिकवण आहे. अन्यथा कर्मबंध अटळ म्हणून आसक्ती विरहित कर्म कर. यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः। तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचार। (३.९) असे कर्म सर्व लोकांच्या हिताला कारणीभूत ठरते. लभन्ते ब्रह्म निर्वाणं ऋषयः क्षणि कल्मषाः। छिन्न द्वैधा यतात्मानः सर्वभूत हिते रताः। (५.२५) अशी व्यक्ती पाप रहित होऊन आत्यंतिक कल्याण प्राप्त करून घेते.

**५) दुःख पचविलेच पाहिजे**

जीवन सुख दुःखांनी भरलेले आहे. सामान्य माणूस दुःखाने निराश होतो. गीता दुःख पचवावयास सांगते. गीता अर्जुनाच्या विषादातूनच निर्माण झाली. साऱ्या कठीणतर प्रसंगाला धैर्याने तोंड दे. न शोभणारे वर्तन करण्याने अर्जुना दुबळेपणा व्यक्त करतोस. क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप। (२.३) मनाचा दुबळेपणा झटकून उठून उभा रहा व प्रसंगाशी दोन हात कर.

**६) दुःखाने खचू नका**

विश्व हे परमेश्वराचे विश्रांती स्थान आहे. दुःखाबद्दल परमात्म्याची निंदा करू नका. विश्वात अधिकतर दुःख मानव आपल्या व्यवहारामुळे निर्माण करतो. सद्विचार व सदाचाराने दुःखे कमी करणे शक्य आहे. शिवाय दुःखे आवश्यकही आहेत. कारण सर्व सद्गुणांचा विकास करण्यास उत्तम संधी मिळते.

**७) कर्तव्य पालन-शाप नसून वरदान**

जीवन म्हणजे कठोर परिश्रम-कर्तव्य पालन. परिश्रम करणे हा मानवाचा हक्क आहे कर्मणि एव ते अधिकारः।

(२.४७) हेच कर्म संपूर्ण मनाने, आसक्ति विरहित करावे. कर्म फलाचे वितरण मानव सेवेत खर्ची घालावे. यालाच कर्मफल त्याग म्हणतात, तोच वैभव प्राप्त करून देतो. आध्यात्मिक जीवन उंचावते. हा विशेष अधिकार न समजल्याने मानव दुःखी होतो. श्रेयो हि ज्ञानमभ्यासा ज्ञानात् ध्यानं विशिष्यते। ध्यानात् कर्मफल त्यागः त्यागात् शन्तिरनन्तरम्। (१२.१२) प्रत्येकाचे जीवन दुसऱ्यावर अवलंबून असणे. अनेक मेहनती व विचारी लोकांमुळे जीवन फुलते. अन्यथा पोकळी निर्माण होईल. वैज्ञानिक आपला शोध संपूर्ण मानव सुखी होण्यासाठी लावतो.

### ८) दृष्ट प्रवृत्तीचा नाश करणेच योग्य

मानवी जीवनात दुष्ट प्रवृत्ती भरपूर आढळते. ही केवळ आपल्या इच्छा मात्रे करून नष्ट होत नाही. दुष्ट प्रवृत्ती हे मानव अपूर्ण असल्याचे द्योतक आहे. संपूर्ण विश्व कधीच सदाचार संपन्न होऊ शकणार म्हणजेच पूर्णतेला पोहोचणार नाही. दुष्टता राहणार. त्याच्याशी धैर्याने दोन हात केले पाहिजेत. त्या सबंधीचे मार्ग- १) दुष्टतेला शरण जाणे २) दुष्टाचे मन परिवर्तन करणे ३) सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे ४) दुष्टाचा नायनाट करणे. अहिंसा हे एक उत्तम तत्त्व आहे. महात्म्यांना याचे पालन शक्य. सामान्यांना हे जमणार नाही. शिवाय दुष्ट प्रवृत्ती पोसली गेली तर त्याजकडून अनेकांची हिंसा घडत राहोत. निरपराधी लोकांची हत्या थांबविणे, धर्म मार्गाने चालणे यासाठी श्रीकृष्ण सांगतात दुष्टांचा नाश अनिवार्य आहे. परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृतां। धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे। (४/८) दुष्ट शक्तीशी धैर्याने दोन हात केलेच पाहिजेत. उत्तिष्ठ युध्याय कृत निश्चय ः।(२.३७) उत्तिष्ठ 'यशोलभस्व। (११.१३) हतो वा प्राप्स्यसे स्वर्ग' जित्वा वा भोक्ष्यसे महीम्। (२.३७) तस्मात् त्वं उतिष्ठ यशो लभस्व। जित्वा शत्रून् भुंक्ष्व राज्यं समृद्ध म्। मयैवेते नि हताः पूर्वमेव। निमित्तमात्रं भव समसाचिन्। (११.३३) शत्रूची उपेक्षा कधी करू नकोस. दुष्ट प्रवृत्ती नष्ट करणेच योग्य.

### ९) मृत्यू अटळ आहे

ही जीवनातील एक दुःखद घटना वैश्विक स्वरूपाची असून ती अटळ आहे. मृत्यू म्हणजे नवे जीवन. जीवनातून निर्माण होणारी घटना आहे. मृत्यूमुळे जग नित्य नूतन व ताजे तवाने राहाते मृत्यू धैर्यानेच स्वीकारला पाहिजे. विवेकी माणसाला मृत्यूचे काही वाटत नाही.तो मृत्यूला वस्त्रांतर समजतो. व्यक्तिमत्त्वाचा नाश न होता उजाळा प्राप्त होतो. नवीन जोम, शक्ती, नवी संधी प्राप्त होतात. मृत्यूला घाबरणे अयोग्य. तो आपला मित्र आहे. पण्डिताः न अनुशोचन्ति। (२.११) धीरः तत्र न मुह्यति। (२.१३) जातस्य हि ध्रुवो मृत्युः। (२.२७) अटळ गोष्टीसाठी शोक करणे अयोग्य.

### १०) गीतेतील ईश्वर कल्पना

ईश्वर सर्वत्र आहे. तो सगळ्यांत व सगळे त्याच्यात समाविष्ट आहेत. विश्व हे त्याचेच व्यक्त रूप आहे. प्रत्येक विचार, कृती, शब्द हेही तोच आहे. या सर्वांचा उपयोग जन कल्याणासाठी करणे योग्य. जनसेवा, ज्ञानदान, औद्योगिक क्षमता, कुशल कर्म ही सारी त्याची सेवा होऊन जाईल. स्वे स्वे कर्मणि अतिरतः संसिद्धिं लभते नरः ।(१८.४५)

### ११) सगळेच मार्ग परमेश्वराकडे जातात

सगळी शास्त्रे आवश्यक. प्रत्येक व्यक्ती वेगळ्या स्तरावरून प्रयत्न करते. साधना बदलण्याबद्दल कुठेही आग्रह नाही. ते आवडीनुसार होते. एक मात्र निश्चित. सगळे मार्ग परमात्म्याकडेच जातात. ये यथा मां प्रपद्यन्ते तां स्तथैव भजाम्यहं। मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः। (४.११) ठोकळेबाजपणा इथे बिलकूल चालत नाही. समानता ऐवजी एकात्मता अभिप्रेत आहे. ईश्वर समानतेचा ठोकळा नाही. यो यो यां यां तनु भक्तः श्रद्धयार्चितुं इच्छति। तस्य तस्य अचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्। (७.२१) श्रद्धेने कोणत्याही विग्रहाची आराधना करावी ती सर्व परमात्म्याचीच पूजा ठरते.

## १२) कार्यकारण भावाचा उगम

निसर्गात सर्वत्र सुव्यवस्था आढळते. संतुलन हा स्थायी भाव हे गृहीत धरुन वैज्ञानिकांनी नियम बांधले. नियमितपणामुळे अटकळ बांधली. आंब्याच्या कोयीपासून आंब्याचेच झाड उगवते. यात बदल होत नाही. मानवी हेतूला याच गोष्टीने कर्म सिद्धांत जन्माला घातला गेला. हाच नीतितत्त्वाचा पाया. अशा प्रकारे कार्यकारण भाव निश्चित केला गेला. प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माला जबाबदार. स्व प्रयत्नाने तो उन्नत वा अवनत होतो. स्वतःचे जीवन घडविणे स्वतःच्या हाती आहे. उद्धरेत् आत्मानात्मान् । (६.५) सर्व शक्तिमान प्रभु यात ढवळाढवळ करत नाही. 'नादत्ते कस्य चित् पापं न चैव सुकृतं विभुः । अज्ञानेत आवृत्तं ज्ञानं तेच मुह्यन्ति जन्तवः । (५.१५) सद्‌गुणाची महति कर्म सिद्धांतामुळे वाढते. मानवाने सतत उत्क्रांत होत राहिले पाहिजे, हेच कर्मसिद्धान्त शिकवतो.

## १३) विज्ञानाने एकत्वाची अनुभूती

ऊर्जा व पदार्थ (एनर्जी व मॅटर) भिन्न नसून एकच आहेत. त्यांच्यात अदलाबदल करता येते. हा विचार वेदान्ताशी मिळता जुळता आहे. अन्नामुळे, जीव, शरीर, मन, भावना, विचार आदि पुष्ट होतात. अन्न जीवनदायी व शक्ती निर्मात्री आहे. म्हणजे अन्न हे माध्यम आहे. अन्नात् भवन्ति भूतानि । (३.१४) म्हणूनच ऋषि महणतात, परमात्म्यापासून सारे निर्माण झाले आहे. प्रत्येकात तो सुप्त आहे. लाकडात व तेलात प्रकाश व उष्णता सुप्त आहेत. योग्य वेळ येताच त्याची अभिव्यक्ती होते. माती, दगड, वीट यांतही जीव व जाणीव सुप्त अवस्थेत आहेत. मात्र ती पडताळून पाहाण्याची वैज्ञानिक उपकरणे नाहीत. देवात्म भाव पाहण्याचे हेच एकमेव कारण.

आणखी एक शक्ती–गुरुत्वाकर्षण–केंद्राकडे खेचणे, दूर टाकणे या शक्तीला माहीत नाही. ही शक्ती मानवात वेगळ्या स्तरावर कार्य करते. त्याचे नाव प्रेम. प्रेमाने एकत्र नांदता येते. दूर लोटणे प्रेमाला माहीत नाही. दूर लोटणारी शक्ती द्वेष. सहकारिता प्रेमामुळेच संभवते. प्रेम हाच खरा जीवनाचा पाया. ईश्वर प्रेम स्वरूप म्हणून त्याकडे आपण खेचले जातो. सर्वाभूती प्रेम हीच धर्माची शिकवण.

## १४) सहकारिता – विविध आविष्कार

केवळ ऐष आराम केवळ देव देव अशा वृत्तीच्या व्यक्ती परमात्म्याचा तिरस्कार करतात. परमात्मा सर्वात आहे. सर्व निर्मितीबद्दल आदर बाळगून योग्य वर्तनाने त्याची आराधना करणे आवश्यक. प्रत्येक कर्म हे देव कर्म व्हावे. प्रार्थना, ध्यान, धंदा,उदीम, उद्योग यांनी त्याची सेवा झाली पाहिजे. हा शुद्ध भाव. यातून सहकारितेचा नियम उदय पावतो. उभयतात सुसंबद्धता, आवश्यकता, तस्व एकमेकांचे कल्याण साधता येते. या संघटित प्रयत्नाला यज्ञ म्हणतात. जगाच्या कल्याणासाठी कार्य करण्याला लोक संग्रह म्हणतात. चातुर्य व शक्तीने संपादन केलेल्या गोष्टी कनशिबी व गांजलेल्याना वितरण करणे हाच फल त्याग अशी आनंदाने ईश्वर सेवा करणे हेच निर्हेतुक कर्म. त्यातून समाज कल्याण म्हणजे ईश्वर सेवा होय.

## १५) योग व त्याची वैशिष्ट्ये

गीता योग शास्त्र आहे. अठरा अध्याय या अठरा योग आहेत. अर्जुना तू योगी हो असे श्रीकृष्ण सांगतात. तपस्विभ्योऽधिका योगी ज्ञानिभ्योऽपि ततोऽधिकः । कर्णिभ्यः च अधिको योगीतस्मात् योगी भवार्जुन । योगाचे अनेक अर्थ संभावतात. १) परमात्म्याशी संबंध जोडणे. २) सख्यत्व निर्माण करणे. ३) इतर मार्गाने परमात्म्याशी नाते जोडणे. यांत अनेक प्रकारच्या साधनांचा समावेश केला जातो. परमेश्वराशी जवळीक साधल्याने दैवी गुणांचा ओघ वळेल. जीवन सुंदर उदात्त उत्तुंग होईल. योगा विरुद्ध जो शब्द आहे त्याला संग म्हणतात. जीव व ईश्वर सांगड

हा योग, मन व बाह्य पदार्थ यांची सांगड हा भोग. पहिल्याला युक्त म्हणतात तरदुसऱ्याला सक्त म्हणतात. सक्ताला युक्त करणे हे योगाचे काम. गीतेतील योगाची व्याख्या- १) योगः कर्मसु कौशलम्. २) समत्वं योग उच्यते.

**१६) योग सतत आवश्यक**

जीवन अनेक प्रसंगांनी युक्त. जितके प्रसंग तितके योग. योग हे जीवनसूत्र आहे. नित्ययुक्त असणाऱ्यालाच योगी असे म्हणतात. ती श्रेष्ठ अवस्था आहे. ईश्वराशी नित्य अनुसंधान हेच गीतेतील ज्ञान. ध्यान, प्रार्थना विशिष्ट वेळी मात्र परमात्म भाव सदोदित पाहिजे. अर्धवेळ सेवा चाकरी संभवते. अर्धवेळ भक्ती व इतर वेळी स्वैर आचरण अभिप्रेत नाही. गीता सांगते - तस्माद् सर्वेषु कालेषु मां अनुस्मर युध्यच। माशी बनू नका मधमाशी व्हा. म्हणून सर्व काळ परमात्म भाव का आवश्यक हे लक्षात घ्या.

**१७) ऐहिक पारलौकिक**

दैवी जीवनासाठी प्रयत्न, त्यासाठी संपूर्ण जीवन दैवी होणे आवश्यक. या कारणाने स्व कर्मणा तं अभ्यर्च सिद्धिं विन्दति मानवः। (१८.४५) शिक्षक असाल-ज्ञानदान करा, डॉक्टर असाल-रोग बरे करा, कामगार असाल- कुशल व उत्कृष्ट प्रावीण्याने काम करा, कोणत्याही क्षेत्रांत असाल त्या अवस्थेतून सर्वांच्या हिताचे होईल असे वागणे हाच योग. जप व ध्यानाने साध्य होणारी गोष्ट याही गोष्टी निर्हेतुक केलेल्या साध्य होतील. समाजसेवी, धर्माचरण, एकमेकांना पूरकच आहेत. मात्र उदात्त हेतूने दोन्हींचे आचरण आवश्यक, हीच खरी धर्म साधना. ऐहिक पारलौकिक कृत्रिम भेद न करता शुद्ध कर्म करा. संपत्ती संग्रह वाईट नाही. त्याचा तिरस्कार करून त्याग करण्यापेक्षा उपभोग त्याग महत्वाचा. मालकी हक्काचा त्याग करून विश्वस्त बना. इहलोक परलोकाहून वेगळे नाही. सद्हेतू हा महत्वाचा, निःस्वार्थ शुद्ध हेतूने भगवंताचे सेवक म्हणून कर्म करा. वेतन वा द्रव्यप्राप्ती भगवंताचा प्रसाद माना, त्यात सर्वांचा वाटा आहे. कारण प्रसाद वाटूनच खवयाचा असतो. या प्रमाणे संपूर्ण जीवन यज्ञमय होईल.

**१८) वासना रहितता**

वासनांवरील जय संपादन आवश्यक. त्या दबवून टाकणे योग्य नाही. त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक व शक्य आहे. धर्म अविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ। (७.११) वासना उत्तम असल्यास जगाचे कल्याण साधता येते. वासनांवर नियंत्रण कसे ठेविता येईल? १) वासना दडपणे २) चुचकारणे ३) उदात्त करणे. जनहित विरोधी वासनांचा निर्दयतेने नायनाट करा. संगतिदोषाने वासना उद्दाम झाल्या असतील तर त्यांना चुचकारा व मार्गावर आणा. वासना नेहमी उदात्त करण्याकडे कल ठेवा. सदा मे मनः शिवः संकल्पयुस्तु। ही धारणा हवी. त्यातून समाज कल्याण साधता येईल. ऐहिक गोष्टीबद्दल बऱ्याच गैर समजुती आहेत. अध्यात्म मार्गातील अडथळा असा एक समज आहे. त्यामुळे आपले ऐहिक जीवन उध्वस्त झाले आहे. जीवनाचे डबके बनले आहे. परिश्रम, कला कौशल्य यांची हेळसांड झाली व दारिद्र्य मात्र जवळ केले. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' ही संतांची शिकवण, विसरलो. संपत्ती वाईट नाही. मात्र तिचा विनियोग जनहितासाठी होणे आवश्यक . मनाचा दुबळेपणा म्हणजे स्वार्थ. तो झाकण्यासाठी संपत्तीच बाजूला करणे हे अयोग्य होय. मात्र शुद्ध मनाने उत्तम व्यवहार करून उत्कृष्ट धडा घालून देणे आवश्यक. याप्रकारे यशस्विता प्राप्त करावी. सर्व कर्म सर्व काही ईश्वराचे पूजन मानावे.

**१९) गीता जीवन गाथा**

गीता हा धार्मिक ग्रंथ नाही. समग्र जीवनाचा ग्रंथ आहे. आपले संपूर्ण जीवन दैवी करता येते. मी देवाचा सेवक आहे. या भावनेने वाटेला आलेल्या कर्तव्य पालनाने देवाची पूजा बांधावी व कल्याण प्राप्त करून घ्यावे. हे अत्यंत

एकांत स्वयंनिर्भयेत असतो.

भावपूर्ण आणि कुशलतेने करावे. मानवी जीवन भौतिक स्तरावरून उठले पाहिजे. कुशलतेने व ज्ञानपूर्वक केलेले प्रत्येक कर्म पूज्य ठरते. अध्यात्म व भौतिक कर्मे पूरक आहेत. उत्साहाने ही कर्मे जगाच्या कल्याणासाठी केली पाहिजेत. प्रत्येक कर्म ईश्वराची पूजा या स्वरूपात व्हावी. स्वार्थ प्रेरित होऊन होणारे कर्म अशुद्ध भाव निर्माण करते. अंतःशुद्धिसाठी निःस्वार्थ भाव आवश्यक असून त्यातून आपल्याबरोबर इतरांचेही कल्याण साधावे. हे करण्यासाठीच आपण सतत प्रयत्नशील रहावे हीच गीतेची शिकवण.

अधिकारापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ होईल तेव्हाच जीवन संघर्ष संपेल. जीवन विशाल होईल, उन्नत होईल. प्रत्येक विचारामागे ईश सत्तेच्या अस्तित्वाची जाण आवश्यक आहे. ती असेल तर धर्म नीती यांचा आवर्जून विचार राहील. त्यातून कर्तव्य जाणिवेची प्रेरणा मिळत राहील. निरपेक्ष बुद्धीने कर्तव्य करण्याची अभिरुची राहाते. उन्नतीचे मार्गदर्शन अशा विचारामुळे होऊ शकते. समाजात नैतिक व सांस्कृतिक निष्ठा वाढीला लागेल. जो मानव स्वकर्तव्य पालन करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे. गीता सांगते 'अधायुः इंद्रियारामः मोघं पार्थ स जीवती। भौतिकता हक्काला प्राधान्य देते तर सांस्कृतिक जीवन कर्तव्याची प्रेरणा देते. श्रीकृष्णाने या वैश्विक समस्येमागे ईश्वरीय अधिष्ठान देऊन नीती व सत्याने वागणारा, आत्मविश्वासाने वागणारा मानव निर्माण करण्याचा गीतेद्वारे विचार मांडला आहे. कल्याणकारी विचाराने वागणाऱ्यांची कधीही अधोगती होत नाही. ' न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

## श्रद्धांजली

आमच्या जोशी बेडेकर महाविद्यालयातील माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. म. पुं. केंदूरकर यांचे अलिकडेच निधन झाले. 'श्री. म. माटे व्यक्ती व साहित्य' या विषयावर त्यांनी पुणे विद्यापीठातून प्रा. रा. श्री. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. पूर्ण केली होती. संत साहित्याचा व काव्यशास्त्राचा त्यांचा विशेष अभ्यास होता. डॉ. केंदूरकर अतिशय वक्तशीर व विद्यार्थी प्रिय होते. १९९३ साली ते महाविद्यालयातून निवृत्त झाले.

त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

– संपादक

## श्रद्धांजली

संस्कृत भाषेचे मर्मज्ञ जाणकार आणि राष्ट्रभाषा हिंदीचे सक्रिय प्रचारक, लोकप्रिय अध्यापक तसेच मुंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती डॉ. मोरेश्वर दिनकर पराडकर यांचे निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते.

प्रख्यात प्राचीन मराठी कवी मोरोपंत यांच्या वंशात जन्मलेल्या 'मो.दि.' नी आपल्या प्रतिभेने आणि अभ्यासाने घराण्याची परंपरा एका वेगळ्याच उंचीवर नेली. संस्कृतचा त्यांचा अभ्यास गाढा होता. संस्कृतमधील सर्व प्रकारच्या साहित्याचा परिचय करुन देणारी ५२ भागांची आकाशवाणीवरील त्यांची मालिका अतिशय गाजली होती.

ते एक लोकप्रिय शिक्षक होते. रुइया, सोमैया महाविद्यालयात त्यांनी दीर्घकाळ अध्यापन केले. तसेच पालघरचे सोनोपंत दांडेकर महाविद्यालय व डोंबिवलीच्या पेंढरकर महाविद्यालय येथे त्यांनी प्राचार्यपदही भूषविले होते. दिशाच्या सुरुवातीच्या अंकात त्यांचे योगदान होते.

डॉ. मो. दि. पराडकरांना श्रद्धांजली!

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. श्री. रविशंकर यांच्या, स्पीकिंग ट्रीमध्ये आलेल्या विचारांवर हा लेख आधारीत आहे.*

**प्रास्ताविक** :

दिशाच्या मागील तीन अंकात, मी महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास यांच्या 'अनुभूतिवाद आणि अनुभूती शास्त्र' ह्या विषयावर लिहिले. ''अनुभूतिवाद'' हा एक आग्रही तत्वज्ञानाचा विषय होऊ शकतो. बुद्धीच्या मानवी तर्कशास्त्रावर आधारलेली तत्वज्ञाने ही 'मानवी बुद्धीच्या' त्या त्या काळच्या साध्या अनुभवातील 'ज्ञानावर' आधारलेली असतात. मानवी बुद्धीच्या मर्यादा व मानवी शरीराच्या मर्त्य साधन संपत्ती, इंद्रिय ज्ञानांच्या क्षमता व भौतिक ज्ञानाच्या मर्यादा, **'ही तत्वज्ञाने'** पार करु शकत नाहीत!

त्यामुळेच, ह्या तत्वज्ञानावर आधारलेल्या भौतिक व अध्यात्मिक चळवळीसुद्धा मानवी मनाला सुखाची, ज्ञानाची त्यांच्या वैश्विक सत्यता स्तरापर्यंत नेऊ शकली नाहीत!!

ह्याचे कारण, मानवी देहातील जीवात्म्याला ह्या पृथ्वीवरील जीवनक्रमात ज्या 'अतींद्रिय ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियांचा वापर ह्या 'वैश्विक चैतन्य गूढाचा' उलगडा होण्यासाठी आवश्यक आहे. त्याचा लाभ उठवता येत नाही. त्यामुळे, भगवद् गीतेतील 'आत्म्याचा उद्धार' म्हणजे 'जीवात्म्याचा उद्धार' परमात्म्याच्या आदर्श स्तरावर व पातळीवर जावा हा उपदेशसुद्धा प्रायोगिक अपूर्ण व अज्ञानी धडपडीपुरताच मर्यादित राहिला आहे. खरोखर 'पुरुषार्थाचा' उपदेश हा 'पुरुषोत्तम योग' साधण्याचा आहे. ह्या पृथ्वीवरील आयुष्यातील 'पुरुषार्थ' कोणता, हे सुद्धा जाणले गेले पाहिजे व तसे कृती करून प्रयत्न सुद्धा व्हावयाला हवेत..!!

मला असे मनोमन वाटते की ह्या योगाची जी शास्त्रे आज मानवी प्रयत्नांनी मिळवली, रचली, आचरली आहेत, त्यांना 'अनुभूती शास्त्राची व त्यांतील तंत्रांची' क्रिया व युक्ती ह्यांचा वापर आवश्यक आहे. त्याची अगदी 'पुसटशी जाणीव' संत, महात्मे, योगी, अवतारी पुरुष आपल्याला वेळोवेळी, युगायुगांतून करून देतात. पण त्या शास्त्राचे सुयोग्य जतन व शास्त्रीय वर्धन हे समाजाकडून जाणीवपूर्वक, निष्ठेने व सातत्याने बिलकुल होत नाही. ह्या 'ज्ञानसिद्धी', ह्या एक व्यक्तिगत चमत्कार व सामान्य माणसाला फार दूर असे साध्य वाटतात. ह्याचे कारणच मुळी ह्या शास्त्राची उपकरणे ही मूलतः मानवी मनाची, चित्ताची व हृदयाची आहेत व ती अदृश्य किंवा अव्यक्त प्रांतातील ही आहेत हे होय. त्यामुळे हा योग दुरापास्त आहे.

त्यामुळे, मानवी मनाच्या सात्विक भावना व आज्ञा आकांक्षा जरी स्तुत्य असल्या, तरी त्यांना भौतिक, व्यावहारिक, सामाजिक स्तरावर ह्या पृथ्वीवर अजूनही ही उंची वा स्थिरत्व वा स्थैर्य किंवा आदर्श उंची गाठता आली नाही. ह्या शास्त्राचा सामाजिक उपयोग दूरच राहिला.

महायोगी अरविंद यांच्या "Integral Sociology" ''एकात्म समाजशास्त्र'' ह्या किशोर गांधी ह्यांच्या पुस्तकातून मात्र ह्या विषयीची दुर्मिळ चर्चा व भाष्य आढळेल. हे जरुर वाचावे व आत्मसात करावे. इतक्या योग्यतेचे व विरळ ज्ञानाचे दर्शन आहे, असे मला वाटते!!

---

शून्य समजावता येत नाही.


**भ्रष्टाचार**



**श्री. श्री. रवीशंकर**

हे मानवी समाजाच्या धडपडीचे स्वरूप पक्का आकार का धारण करत नाही. हे समजण्यासाठी आपण सध्याचा 'भ्रष्टाचार' ह्या मानवी समाजाच्या प्रचालित भीषण व्यथेचे किंवा संकटाचे वृत्त वाचू या व त्यावर 'श्री. श्री. रवीशंकर' (The Art of Living) 'जगण्याची कला' ह्या दृष्टिकोनातील वर्तमानपत्रातील भाष्य वाचू या. त्याचे संक्षिप्त भाषांतरित रुपांतर मी इथे करतो आहे.

टाइम्सच्या 'The Speaking Tree' ह्या पुरवणी अंकात "Volunteer For A Better India" (उन्नत भारताकरिता स्वयंसेवक) हा लेख वाचला. त्याचा विषय असा होता की स्वच्छ व प्रामाणिक व्यवहार, समाजात रुढ व्हावा, याची नवी चळवळ भारतांत मूळ धरू लागली आहे.




**The Speaking Tree**

जास्त जास्त स्वयंसेवक हे एकत्र येऊन व त्यांच्या संस्था व गट तयार होऊन स्पिरीच्युअल काम करून आपल्या व समाजाच्या आयुष्यात नैतिक मूल्ये यावीत असे नूतन प्रयत्न जोर धरू लागले आहेत.

श्री. श्री. रवीशंकर, (लोकप्रिय आध्यात्मिक गुरु) नवी दिल्ली येथे एका समारंभात बोलत होते. भ्रष्टाचाराच्या बोकाळलेल्या नवीन संकटाच्या प्रतिकारार्थ युनायटेट नेशन्सच्या सहकार्याने स्वयंसेवकांची एक नवीन संघटना निर्माण करण्याचे प्रयत्न व्हावे म्हणून उपदेशपर व्याख्यान देत होते.

मूळ इंग्रजी रिपोर्ट असा आहे.

"To free ourselves of bribery and nepotism, it is imperative to know where their roots are. If we go deeper, we will find that it actually starts at the level of the individual and that is where the solutions lies."

Therefore, says the revered Guru, qualities of heart are important, inner strength contentment, compassion, integrity and intution are the values that makes one spiritiual. "chanting some prayers and visiting holy places is not spirituality, but developing such values is" he said, emphasising that integrity and intution come only when there is inner strength and meditation helps us with that."

'भ्रष्टाचारा' सारख्या समाजाला कॅन्सरसारख्या रोगाने ग्रासून टाकणाऱ्या ''मानवी स्वभावातील व समाज मानसातील दोषाला, सध्याच्या अध्यात्मिक गुरुंनी दखल घेऊन त्यावर उपाय सांगावा हे अत्यंत आवश्यक आहे.

पण, ह्या उपदेशाचा परिणाम होऊन समाज व माणूस प्रत्यक्षात किती सुधारतो हे पाहाणे सुद्धा आवश्यक आहे. अशासाठी की हा सदुपदेश केवळ मानवी मनाच्या पृष्ठभागावरील तरंगा एवढाच परिणाम करतो असे वाटते. ह्या सदुपदेश व अत्यंत हृदयापासून सांगितलेल्या भाष्याचा

परिणाम, खोलवर होऊन, माणूस व समाज ह्यामध्ये कायम स्वरूपाचा बदल होताना, खचितच दिसतो, असे दिसते!!

हे असे का व्हावे?

म्हणूनच, ह्याचे कारण व उपाय शोधण्याकरिताच केवळ, ह्या शुद्ध हेतूने, मी हा प्रसंग व घटना निवडली आहे.

भारतीय संस्कृती यावर अगदी खोलवर व मूलगामी विचार व योजना व साधना सांगितल्या आहेत व रचल्या आहेत. ह्या साधना व योगयज्ञ क्रिया वैयक्तिक स्तरावर व सामाजिक स्तरावर राबविण्यात, ह्या देशाच्या भूतकाळात गेल्यावर, त्या सापडतात!! आज, त्या उध्वस्त व विस्मृतीत व अनादराने व अंधश्रद्धेने नाहीशा झाल्या आहेत.

हे बघण्यापूर्वी, मी या इंग्रजी हितोपदेशाचे मराठी स्वैर भाषांतर करुन मग त्यावरील भाष्य करीन, असे म्हणतो आहे!! कदाचित हा विषय पुढच्या अनेक अंकातून 'दिशा' मधून मांडावा लागेल.

प्रत्यक्षात, हा हितोपदेश असा आहे!!

''लाचलुचपत व वशिलेबाजी ह्यापासून मुक्ती मिळण्यासाठी हे अत्यावश्यक आहे की ह्या (दोषांची, रोगाची) मुळे कुठे आहेत.

आपण जर खोलवर विचार केला तर असे लक्षात येईल की त्याचा उगम हा व्यक्तीच्या स्तरावर प्रत्यक्ष होतो आणि त्यामुळे त्याच्यावरचा उपायसुद्धा तिथेच सापडतो.''

त्यामुळे आदरणीय आध्यात्मिक गुरू सांगतात की, ''हृदयाची गुणवत्ता महत्वाची आहे, आंतरिक शक्ती, समाधान, करुणा, प्रामाणिकपणा आणि उपजत ज्ञान वा अंतर्ज्ञान ही मूल्ये व्यक्तीला 'स्पिरीच्युयल' बनवतात.

(मी 'स्पिरीच्युयल' हा शब्द मुद्दाम वापरला कारण 'अध्यात्मिक' ह्या शब्दाला जीवात्म्याच्या संकल्पनेची माहिती असणे आवश्यक आहे.)

आत्मा, परमात्मा, जीवात्मा ह्या भारतीय संस्कृतीतल्या विशेष संकल्पना आहेत व त्या जाणूनच त्या क्रियांचा अर्थ लावला पाहिजे.

''काही प्रार्थना म्हणणे, धर्मस्थळांना भेटी देणे, म्हणजे स्पिरीच्युॲलिटी नव्हे. तर ही जीवनमूल्ये निर्माण करुन जतन करणे आवश्यक आहे. सद्गुरु रवीशंकर ह्या मुद्यावर भर देऊन पुढे म्हणाले की,''प्रामाणिकपणा व अंतर्ज्ञान तेव्हाच प्राप्त होते, जेव्हा अंतःर्गक्तिव ध्यान धारणा 'मेडीटेशन' केले जाते.''

आता आपण ह्या उपदेशातील उपाय योजना व त्याच्या संकल्पना 'शब्दांच्या' माध्यमातून पाहू या. मग ह्या संकल्पनेत कोणते बदल व्यक्ती व नंतर समाजात होऊ शकतात व त्याची 'यंत्रणा' नेमकी कोणती व ही जादू व किमया 'मानवी देह, वृत्ती, संस्कार' ह्या मार्गाने कशी होईल किंवा होऊ शकते ह्यावरील शास्त्राचा शोध घेऊया.

ह्या उपदेशातील प्रत्येक शब्दामागील संकल्पना मानवी मनाच्या, दृश्याच्या अनुभवाच्या कोणत्या कोपऱ्यात असतात व त्यावर कुठले ज्ञान, स्त्रोत, कुठले ज्योतिज्ञान प्रकाश टाकते वा टाकू शकेल ह्याचा विचार करू या.

**भ्रष्टाचार**

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार. मग प्रथम चांगला आचार कोणता? भ्रष्ट व तो होणे किंवा असणे हे कोण व्यक्ती कोणत्या मार्गाने जाणू शकेल?त्याला ह्या सदाचार व भ्रष्टाचार ह्या बद्दलची कल्पना व त्यांतील फरक जाणण्याची 'क्षमता' व ती सुधारण्याची वृत्ती निर्माण होणे आवश्यक आहे. ही वृत्ती बदलण्याची क्रिया कोणत्या स्तरावर होणे आवश्यक आहे? मनावर, बुद्धीवर, हृदयावर, आत्म्यावर, अंतःकरणावर!!

समाजात सध्याच्या काळात ह्या दोन संकल्पनाबद्दल काय फरक जाणला जातो आहे. समाजाच्या इतिहासात


ह्या दोन संकल्पनांत कोणते बदल होत गेले? कशामुळे, ह्या बदलांची कारणे आर्थिक, नैतिक वा इतर कोणत्या जातीची जाणली जातात?

मग मानवी 'सदाचाराची' आदर्श संकल्पना कोणत्या काळात मांडली गेली व ती स्थिर, अविचल राहिली की बदलत गेली? हा बदल कोणत्या निकषावर मांडला गेला व त्याचा व्यक्ती व समाजावर कोणता प्रभाव पडला.

मी ज्या पद्धतीने हे मुद्दे उपस्थित करतो आहे. हे कदाचित नवीन वा दुर्लभ वाटेल. पण, त्याचे कारण हेच की कुठल्याही प्रश्नाची उकल होण्यासाठी ज्या तऱ्हेचा मूलगामी विचार करावयाला लागतो, ती यंत्रणा केवळ 'व्यक्तिगत', वैचारिक क्रियेवर अवलंबून नसते. ती निव्वळ भौतिक वा अध्यात्मिक नसते तर Integral (एकात्म) असते. त्यामुळेच एकाच तंत्रज्ञानात तिचा उल्लेख करावयाचा झाल्यास ह्या मूलगामी विचार यंत्रणेला जे नाव श्री रवीशंकर वा इतर थोर व्यक्तींनी दिले आहे त्याचे इंग्रजी नाव 'Meditation' आहे, तर भारतीय वेदिक संस्कृतीत 'योग' साधना व त्याची सामग्री ध्यान, धारणा, समाधी, असंप्रज्ञात समाधी व विभूतिपाद व कैवल्यपाद अशी प्राथमिक चर्चेत सांगता येईल.

ही विधाने अतिशय ढोबळपणे केली आहेत. कारण, त्याचा पूर्ण विस्तार एका लेखात काय पण प्रत्यक्ष क्रिया करताना सुद्धा जाणणे आवश्यक आहे.

मी या लेखाचा शेवट इथेच करणार आहे. पण, त्यापूर्वी आणखी एका मुद्याचा विचार मांडून नंतरच्या लेखात त्याचा विस्तार करणार आहे.



**महायोगी अरविंद**

महायोगी अरविंद यांनी ह्या मानवी नीतिमूल्यात होणाऱ्या बदलाची क्रिया व्यक्ती व समाज यांच्या आत्मिक स्तरावर विशद केली आहे.

याचे कारण उघड आहे. व्यक्ती व समाज हे दोन्हीही घटना 'मर्त्य' आहेत. याचा अर्थ त्यांच्या देहीक, भौतिक आयुष्याला ह्या पृथ्वीवर शेवट आहे. पण, व्यक्तिगत जीवात्मा व 'समाजाला असलेल्या सामाजिक आत्म्याला' पुढचा उत्क्रांति (Evolution of Consciousness) ह्या वैश्विक तत्वावर प्रवास व उर्ध्वगती ही प्राप्त आहे. ह्या क्रियेत नैसर्गिक व मानवी प्रयत्न ह्या दोन्ही क्रियांची भागीदारी होत असते. महायोगी अरविंद ह्या नवीन सिद्धान्ताला 'Group Soul' व 'Individual Soul' अशा संज्ञा देऊन त्याचे त्यांना झालेले साक्षात्कारी दर्शन विस्ताराने मांडतात. त्याचा संदर्भ किशोर गांधी ह्यांच्या 'Integral Sociology of Aurobindo' ह्या पुस्तकात मांडतात. तो भाग पुढच्या लेखात मांडण्याचा प्रयत्न करू या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : saneyr@mtnl.net.in

●●●

या देहाने स्वर्ग सुख मिळत नाही, त्यासाठी देहातीत व्हावे लागते.

# अश्लील चित्रपटाची पोस्टर्स सार्वजनिक वहानांवरती आणि रस्त्यावरती लावण्याबद्दल निषेध

*वरील संदर्भातील कायद्यांची उपयुक्त माहिती या लेखात आहे.*

अलिकडे काही दिवसांपूर्वी मुंबई महानगर पालिकेच्या प्रशासनाने अश्लील चित्रपटाची पोस्टर्स बेस्ट (BEST) बसेस आणि डेपो या ठिकाणी लावण्यापासून मज्जाव करणारी प्रभावी मोहीम राबविली.

''जिस्म-२'' या चित्रपटाच्या पोस्टर्सनी या वादाला सुरुवात झाली. कारण ''केंद्रीय चित्रपट प्रमाण बोर्ड'' यांनी या चित्रपटाला 'अ' प्रमाणपत्र दिले. हा चित्रपट समाजातील सर्व स्तरामधील व्यक्तींनी बघण्यासाठी पात्र नसून फक्त 'प्रौढ' व्यक्तीच बघू शकतात असे हे प्रमाणमत्र होते.

त्या पोस्टरवरती एका, अर्धनग्न स्त्रीने पांढरे भिजलेले अंगवस्त्र अशा पद्धतीने अंगावरती ओढलेले जेणे करुन बघणाऱ्यांच्या मनामध्ये अश्लील भाव निर्माण होतील. अशी पोस्टर्स सार्वजनिक ठिकाणी सर्व लोक, मुले, मुली यांच्या दृष्टीस पडतील अशा पद्धतीने लावण्यात आली होती. बसेस असतील, वीजेचे खांब असतील किंवा लहान झोपड्या असतील समाजातील नैतिकतेवर आघात करणारी पोस्टर्स सगळीकडे दिसत होती.

महाराष्ट्र विधिमंडळातील एका सदस्याने या गोष्टीला विरोध केला आणि ही गोष्ट मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाच्या लक्षात आणून दिली. ही सर्व पोस्टर्स अतिशय बीभत्स असून कोणत्याही सुज्ञ नागरिकांच्या भावनांवरती दुष्परिणाम करणारी आहेत असे पालिका प्रशासनाच्या निदर्शनास आले.

मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्वरित ७५ बसेस २५ बस डेपो तसेच विजेचे खांब, बसखांबे यावरील सर्व अश्लील पोस्टर्स काढून टाकले. मुंबई महानगरपालिका कायदा, १९८८ मधील कलम-६३(K) , ६४(३)(C) आणि ३२८ तसेच स्त्रियांचे अश्लील वर्णन (प्रतिबंधक) कायदा १९८६ कलम-३ नुसार मुंबई महापालिकेने वरील कृती प्रभावीपणे आणि तत्परतेने केली.

स्त्रियांचे अश्लीलपणे वर्णन म्हणजे नको त्या पद्धतीने त्यांची शरीरयष्टी (Figure) दाखवणे किंवा शरीराचा विशिष्ट भाग दाखवणे ज्यामधून बीभत्सपणा किंवा ओंगळवाणा भाव निर्माण होईल. स्त्रियांचा दर्जा, स्थान कमी किंवा खालच्या स्तरांवरती दाखवून सार्वजनिक नीतीमूल्ये किंवा नीतीमत्ता यावर आघात होईल या पद्धतीने स्त्रीयांचे वर्णन करणे होय.

अशा प्रकारच्या अश्लील पोस्टर्समुळे स्त्रीचे चारित्र्य हनन तर होतेच पण त्याचबरोबर समाजामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्यासाठी आणि एकूणच स्त्रियांचे जीवन आणि त्यांची प्रतिष्ठा धोक्यात येण्यासाठी या गोष्टी बऱ्याचवेळा कारणीभूत ठरतात. कारण कुणा व्यक्तीच्या मनामध्ये अश्लील भाव निर्माण करण्यासाठी ही अशी पोस्टर्स पुरेशी ठरतात. सार्वजनिक ठिकाणी अशा पोस्टर्समुळे रिक्षाचालक, टॅक्सीचालक यांचे लक्ष वेधून घेतल्यामुळे बऱ्याचवेळा अपघातही होतात.

पोस्टर्स प्रदर्शित करणारे असेही म्हणू शकतात की भारतीय राज्यघटनेत अनुच्छेद १९ (१)(अ) मध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकास दिले आहे आणि त्यानुसार पोस्टर्स प्रदर्शित करणे हे मूलभूत अधिकारामध्ये

---

सरलता हे ज्ञानाचे एक लक्षण आहे.

येते. पण त्याच संविधानाने अनुच्छेद १९ (२) मध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घातलेल्या योग्य निर्बंधानुसार हे स्वातंत्र्य सार्वजनिक हित, नैतिकता आणि सभ्यता यांच्या आधीन राहून उपभोगायचे आहे. त्यामुळे या गोष्टी पोस्टर्स तयार करणाऱ्यांनी लक्षात घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

कदाचित असे समजले जाऊ शकते की, चित्रपटांच्या जाहीराती नियंत्रित करण्याचे काम ''चित्रपट परिनिरीक्षण (Cencor) बोर्डाचे असते. पण खरी परिस्थिती खूपच वेगळी आहे.

सिनेमॅटोग्राफ कायदा १९५२ यामधील नियम अथवा मार्गदर्शक तत्त्वे यामध्ये अशलीलते संबंधी गोष्टीचा समावेश किंवा नियंत्रण यांचा समावेश प्रभावीपणे या कायद्यामध्ये दिसून येत नाही. या गोष्टी अश्लीलतेसंबंधी देशामध्ये असणाऱ्या सर्व समावेशी कायद्यामध्ये आणि प्रामुख्याने भारतीय दंड संहितेच्या कलम-२९२ आणि २९३ यामध्ये दिसून येतात. भा.द.वि. २९२-२९८ मध्ये अशा प्रकारचे कृत्य म्हणजेच सार्वजनिक आरोग्यास व नैतकतेस धोका पोहोचविणारे गुन्हे आहेत व ते शिक्षेस पात्र आहेत. तसेच भारतीय गुन्हे प्रक्रिया संहितान्वये अशा प्रकारचे वितरत केलेले साहित्य व साधन दंडधिकाऱ्याने ओदश देवून तात्काळ जप्त केले जावू शकतात. त्याचबरोबर केंद्राने किंवा राज्याने बनविलेल्या अन्य कायद्यामध्ये त्याचा समावेश दिसून येतो. महिलांचे अश्लील वर्णन (प्रतिबंधक) कायदा १९८६ हा कायदा किंवा या कायद्याची अंमलबजावणी विकास विभाग यांच्याकडे आहे. परंतु या संदर्भात कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक अधिकारी किंवा स्थानिक प्रशासन यांची आहे.

मग हे प्रशासन आपल्या अधिकाराचा कितपत वापर करून यावरती नियंत्रण घालू शकते यासंदर्भात किती राज्यांनी किंवा महानगरपालिका किंवा नगर प्रशासन यांनी नियम बनविले आणि पुढे नियम बनवून त्याची अंमलबजावणी किती योग्य पद्धतीने केली गेली. कारण अशी पोस्टर्स प्रत्येक राज्यामधील शहर, गाव या ठिकाणी लावलेली दिसतात पण त्यावरती नियंत्रण, निर्बंध दिसून येत नाही.

अशी अश्लील पोस्टर्स सार्वजनिकरित्या प्रदर्शित करण्यावर निषेध आणि निर्बंध घालण्याची गरज आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाण मंडळ (Cencor Board) चित्रपटाला प्रमाणित करताना खात्री देते कि पब्लिसिटी स्क्रीनिंग कमिटीने चित्रपटातील सर्व भाग तपासून पाहिला असून तो सार्वजनिक स्वास्थासाठी हानिकारक नाही. याचा उद्देश अश्लीलतेपासून परावृत्त होऊन महिलांची प्रतिष्ठा जोपासणे आणि चित्रपटातील भडक दृष्ये (गुन्हेगारी) टाळणे हा असतो.

बेस्ट (BEST) ही शासनाची परिवहन सेवा आपल्या बसेस किंवा बस थांबे या वरती उत्पन्न मिळविण्याच्या उद्देशाने जाहिराती लावते. पण यामध्ये बेस्ट असेल किंवा अन्य कोणतेही मंडळ संस्था असेल त्यांनी पोस्टर्स लावू देण्या अगोदर नगर प्रशासन किंवा पब्लिक स्क्रीनिंग कमिटी यांनी पोस्टर्ससाठी परवानगी दिलेली आहे की नाही किंवा पोस्टर लावण्यासाठी प्रमाणित केले आहे का? याची खात्री करुनच घेतली पाहिजे तरच असे ओंगळवाणे, लज्जास्पद प्रकार थांबतील.

भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांसाठी अनुच्छेद ५१ (A) (C) मध्ये महिलांप्रती किंवा त्यांची प्रतिष्ठ कमी करणाऱ्या सर्व चालिरिती प्रथा सोडून देण्याचे दायित्व दिले आहे.

अश्लीलतेची व्याख्या ही कालपरत्वे स्थलपरत्वे बदलणारी आहे. फक्त स्त्रियांना अश्लील दाखवणे आणि पुरुषांना न दाखविणे यामधूनही किंवा मग पुरुषांनाच अश्लील दाखविणे यामध्ये मानवी प्रतिष्ठेची हानी होतेच आणि म्हणून

परमेश्वराला प्रेमानेच प्राप्त करता येते.

अनुच्छेद २१ नुसार कोणत्याही परिस्थतीत मानवी प्रतिष्ठेची (Human dignity) हानी होता कामा नये.

भारतीय दंड संहितेनुसार ''अश्लीलता'' ही लिंगभेद-रहीत असली पाहिजे. पण कदाचित भारतीय समाजव्यवस्थेमध्ये स्त्रिया या भेदभावामध्ये पूर्वीपासून सापडल्यामुळे अशा गोष्टींना आज ही भारतीय समाज व्यवस्थेला सामोरं जाव लागत आहे.

- **सौ. स्वाती बाल तांबे (एल.एल.बी. विद्यार्थीनी)**
- **अधिक माहिती : प्रा. श्रीविद्या जयकुमार**
- **भाषांतर : प्रा. मिथुन बनसोडे**

•••

## *सेलफोन वापरताना*

- कुणाला पहिल्यांदाच फोन करीत असाल तर शक्यतो कार्यालयाच्या वेळेत कॉल करा.
- त्यांच्या कामामध्ये व्यत्यय आणल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यास विसरू नका.
- तुम्हाला माहीत नसलेल्या एखाद्या व्यक्तीला फोन केला असल्यास, तीच व्यक्ती फोनवर आहे याची अगोदर खात्री करून घ्या.
- तुम्ही कॉल केलेली व्यक्ती जर परदेशात किंवा बाहेरगावी आहे, असे सूचित करीत असल्यास महत्त्वाच्या कामाशिवाय बोलणे वाढवणे टाळा.
- कामासंदर्भात कॉल केला असेल तर समारेची व्यक्ती कामात किंवा गडबडीत आहे का, हे अगोदर विचारा आणि मगच बोला.
- आपला मोबाईल दाखवून उगाचच स्वतःचं महत्त्व वाढवायचा प्रयत्न करु नका.
- नाट्यगृह, चित्रपटगृह, मिटिंग्ज, हॉस्पिटल इ. ठिकाणी आपला मोबाईल 'सायलंट मोड' वर ठेवा. या ठिकाणी मोबाईलवर बोलायची वेळ आल्यास इतरांना त्याचा त्रास होणार नाही, याची काळजी घ्या!
- आपला मोबाईल चार्जर नेहमी सोबत बाळगा.
- कॉल आल्यास त्याचे उत्तर कॉलनेच द्या आणि मेसेजचे उत्तर मेसेजने.
- एसएमएस करताना आपण उद्धट वाटणार नाही याची काळजी घ्या!

## मानवजातीची पुनर्रचना

**काही शास्त्रज्ञ जेनेटिक इंजिनिअरींगचा विकार मानव जातीची पुनर्रचना करणारे शास्त्र म्हणून करत आहेत. या संदर्भात ज्यूलियन हक्सले यांनी रूढ केलेला 'ट्रान्सह्युमनिस्टस' हा शब्द त्यांनी स्वतःसाठी वापरला आहे. बायोएथिसिस्ट मॅक्सवेल मेहलमॅन यांनी या विचारास दुजोरा देताना असे म्हटले आहे की, आपण मानव प्रणालीचे रीइंजिनिअरिंग नक्की करू शकू. या संदर्भात या प्रक्रियेत होऊ शकणाऱ्या काही चुकांचा विचारही ते आपल्या विवेचनात मांडतात.**

**या संदर्भात अलीकडेच आलेल्या एका पुस्तकाचा निर्देश करावासा वाटतो. ट्रान्सह्युमनिस्ट ड्रीम्स अँड डिस्टोपिसन नाइटमेअर्स** (Transhumanist Dreams and Dystopian Nighmares : ThePromise and Peril of Genetic Engineering) **मॅक्सवेल जे. मेहलमॅन यांचे हे पुस्तक जॉन हॉपकिन्स युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केले असून २०१२ मध्ये हे पुस्तक आले आहे.**

**या पुस्तकाचा परिचय २६ ऑक्टोबर २०१२ च्या 'सायन्स'मध्ये आला आहे. जेनेटिक मॉडिफिकेशन्स, जेनेटिक रीइंजिनिअरींग या नव्याने प्रगत होणाऱ्या ज्ञानशाखांशी संबंधित अभ्यासकांनी हा परिचय वाचून पुस्तक पाहण्यासारखे आहे.**

**संदर्भ : 'सायन्स' खंड : ३३८**
**२६ ऑक्टोबर २०१२, पृ. ४५०-५१**

•••

अनावश्यक व अतिभोग वर्जित आहे.

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर

*गुरुदेव रविन्द्रनाथ टागोरांच्या प्रार्थनांची ही भाषांतरे मूळ कवितेतील नजाकत भाषांतर शैलीतून कशी उतरली आहे ते आवर्जून पाहण्यासारखे आहे. – संपादक*

*3*
*I Know not how thou singest, my master!*
*I ever listen in silent amazement.*
*The light of thy music illumines the world.*
*The life breath of thy music runs from sky to sky.*
*The holy stream of thy music breaks through*
*all stony obstacles and rushes on.*
*My heart longs to Join in thy song,*
*but vainly struggles for a voice, I would speak,*
*but speech breaks not into song, and I cry out baffled.*
*Ah, thou hast made my heart captive*
*in the endless meshes of thy music, my master!*
*- Gurudev Ravindranath Tagor*

*नाहीच रे ठाऊक मजला कसे बरे  गातोस तूं? माझ्या प्रभो!*
*राहतो केवळ ऐकतच तुझे गीत सदा निरव अनुभूतीतूनी.*
*आभा तुझ्या संगीताची करी भासमान साऱ्या जगा!*
*सुस्वर नाद तंव संगीताचा राहतो पसरत गगनागगतनांतूनि!*
*पवित्र पावन जलोघत्याचा झेपावतो वेगेवेगेपुढे*
*पाषाणांच्या थराथरांतून कापीत दुस्तरे दूरदूरवर.*
*वाटते मला माझ्या मनांतूनी खोल खोलवर*
*सामील व्हावे या तंव अमर मधुर गीतातूनी*
*पण झगडतच राहतो मी शोधीत सुस्वर नाद,*
*अन सुयोग्य शब्द, पण नाही रे प्रकटत कांहीं, केवळ फुटते रडे!*
*शेवटीं पटते मला की केलेस तूं बंदिवान मानस माझे*
*अतूट, अमर अन् अभंग मायाजालांतून तुझ्या संगीताच्या.*
***– असीम***

इंद्रियांच्या आवडी निवडीवर आपलं सुख दुःख ठरता कामा नये.

*4*

*Life of my life, I shall ever try*
*to keep my body pure, knowing that thy*
*living touch is upon all my limbs.*

*I shall ever try to keep all untruths out from my thoughts,*
*knowing that thou art that truth which has kindled*
*the light of reason in my mind.*

*I shall ever try to drive all evils away from my heart*
*and keep my love in flower, knowing that thou hast thy seat*
*in the inmost shrine of my heart.*

*And it shall be my endeavour to reveal thee in my actions,*
*knowing it is thy power gives me strength to act.*

*- Gurudev Ravindranath Tagor*

*माझ्या जीवाच्या जिवलगा करीन मी सायास सदा*
*राखण्या पावन माझी काया जेथे तूं राहतोस गात्रा गात्रांतूनी*

*करीन मी सायास सहा राखण्या दूर असत् मम विचारांच्या*
*जाणतो मी पुरेपुर दाविलास तूं सत्प्रकाश मम मानसांत*

*करीन मी सायास सहा पिटाळण्या दूर दूर साऱ्या दुर्वासना*
*जाणतो मी की आहेच सिंहासन तुझे माझ्या हृदमंदिरी गाभाऱ्यात*

*करीन मी सायास दाखविण्या तुलाच माझ्या कामा कामातूनी*
*जाणतो मी आहेच तुझे चैतन्य वसलेले माझ्या रोमारोमांतूनी.*

*– असीम*

इंद्रियांच्या दोलायमान अवस्थेने अंतःकरण व्यापलं जाता कामा नये.

# मी का नाही ?

*अनाठायी शहरीकरणातून पर्यावरणाचे संतुलन बिघडते आहे. सामान्यातील सामान्य माणसाने याचा विचार करायला हवा. – संपादक*

आपल्याला एखादी गोष्ट करावयाची नसेल तर 'दुसरा ती करीत नाही, मग मी एकटाच काय म्हणून करू.' हा विचार फार पटकन सुचतो. 'असं असं करु नकोस, त्सात सर्वांचे नुकसान आहे' असे कोणाला पटवून सांगितले तर तो प्रत्युत्तर देतो. 'मला काय करायचंय त्याच्याशी, मी करणार, कोणाच्या बापाचं खात नाही'. 'मला काय त्याचे' हा स्वार्थी विचार आपल्या देशाला देश म्हणून जगणे अशक्य ठरवीत जाणारा प्रश्न आहे व पर्यायाने स्वतःच्याच भविष्यातले सूर्योदय नाकारणारा घातक दृष्टिकोन आहे.

एकूणच समाजजीवनात स्वैराचाराकडे प्रवृत्त करणाऱ्या दृष्टिकोनाचा आढळ होणे हे दुर्दैव आहे. पण यातून माणूस, अगदी सामान्य माणूस पर्यावरणाचा जो ऱ्हास करीत आहे तो जाणवला की मानवी जमात ही 'endengered' जमात वाटायला लागते. 'स्वतःच्या हाताने स्वतःच्याच पायावर घाला घालणे' अशी एक म्हण आहे, तिचा अर्थ समजू लागतो.

गेल्या शतकापासून झपाट्याने वाढलेले औद्योगिकीकरण, विज्ञानाची आवाक् करणारी प्रगती, दुसऱ्या महायुध्दाचे समाजरचनेवर मूलभूत व दूरगामी असे परिणाम या सर्वांमधून लोकसंख्येच्या केंद्रीकरणाचा प्रश्न उद्भवला. माणसे शहरांकडे धाव घेत सुटली. पारंपरिक शेती उद्योग सोडून चाकरमानी बनण्यात धन्यता मानू लागले व यातून निर्माण झाला प्रश्न, तो म्हणजे शहरीकरणाचा. महात्मा गांधींच्या अनेक विचारांना स्वार्थापोटी आपण मूठमाती दिली. त्या तील एक विचार म्हणजे 'खेड्याकडे चला!' स्वैराचाराच्या ओढीतून नेमके उलट आम्ही वागलो आणि 'शहरांचा विकास' नावाच्या भ्रामक आणि भकास मायाजालात अडकलो.

**शहरीकरण**

या अनाठायी शहरीकरणातून 'पर्यावरणाचे संतुलन बिघडविणे' हा जणू काही 'एक कलमी' कार्यक्रम आपल्याला राबवायचाय अशा पध्दतीने ही शहरी, सुशिक्षित (!) माणसे वागू लागली. त्यामुळे शहरी जीवनाचे अस्तित्व सुकर व सोपे व्हावे या दृष्टीने ग्रामीण जीवन,जंगले, निसर्गातील साधनसंपत्ती याचे वारेमाप शोषण सुरू झाले. उदाहरणच द्यायचे झाल्यास इमारतीसाठी वापरली जाणारी खडी प्राप्त करुन घेण्यासाठी डोंगर पोखरले गेले. त्यांच्यावरील पारंपरिक निसर्ग जीवन उध्वस्त झाले.

पर्यावरणाच्या असंतुलनाची परिसीमा व जाणीव ही दोन्ही या शतकातली आश्चर्येच म्हणावी लागतील. या जाणीवपोटी काहीजण जागे झाले. संस्था तयार केल्या गेल्या आणि Save nature for future यासारख्या घोषणाही दिल्या गेल्या, जात आहेत. मराठी समाजापुरते बोलावयाचे झाल्यास टी.व्ही. या प्रसारमाध्यमातून निसर्गविचारांचा प्रसार करण्याचा भाबडा प्रयत्न झाला व गेले पाव शतकभर दोन कार्यक्रमांच्यामध्ये Filler म्हणून 'झाडे लावा झाडे जगवा' असा संदेश देणारी वाक्ये दूरदर्शनसारख्या माध्यमातून प्रसारित केली जाऊ लागली. झाडे लावा हे खरे, पण लावायची कोणी...? फोटोत छापून येण्याच्या हौसेपायी लोकप्रतिनिधींनी, नेत्यांनी की मी हा विचार आपल्या मनात येत नाही. 'पर्यावरण बिर्यावरण अशा या गोष्टी आपल्याला जमत नाहीत...' असे म्हणणारे

शरीर धारणेला आवश्क तेवढेच भाग घ्यावेत.

लोक भेटले की त्यांना सांगावेसे वाटते, मग हा देशही तुमचे काही देणे लागत नाही. कारण निसर्गाचे मी सुध्दा काही देणे लागतो ही जाणीव सामान्य माणसाला होणार नाही, तोवर निसर्गाचा समतोल बिघडतच जाणार.

**भ्रामक समजूत**

शहरातील माणसाला निसर्गाचा विध्वंस करण्यास आपण कारणीभूत नाही असे वाटत असते. त्याच्या म्हणण्यानुसार 'मी लाकूड जाळीत नाही, नदीचे पाणी खराब करीत नाही की शिकारही करीत नाही. मग मी काय म्हणून निसर्गाचा विचार करावा? पण आत्मपरीक्षण केलं तर महाराष्ट्रापुरतेच लक्षात घ्यावयाचे झाल्यास,३३६ लहानमोठ्या शहरांतील नागरिकच निसर्गशोषण करण्यास कारणीभूत आहेत. ब्लॉक नावाच्या घरासाठी लागणारे लाकूड, पशूपक्ष्यांना बेघर करुन सुजत जाणारी लोकवस्ती, धूर ओकणारे कारखाने, कारण असताना-नसताना होणारा कागदाचा अपव्यय अशा कितीतरी गोष्टींतून सामान्य माणूस निसर्गाच्या घटकांचा नाश करीत आहे.

साधा कागद व कागदाचा वापर हा विचार जाणकारास अस्वस्थ करण्यास पुरेसा आहे. लायकी नसताना छापले जाणारे काव्यसंग्रह कथासंग्रह, जाहिरातीपोटी वापरला जाणरा कागद, बस-रेल्वेच्या तिकिटांसाठी वापरला जाणारा कागद...या कागदाच्या निर्मितीपोटी हजारो जंगले नष्ट होतात. कागदासारखी नैसर्गिक मिळणारी देणगी ज्या पध्दतीने शहरात वापरली जात, ती पाहिली की बचतीचे संस्कार करण्याची गरज जाणवते.

नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द असणाऱ्या भारतासारख्या देशात आज शाळा-शाळांतून निसर्ग विचारांचे संस्कार घडण्याची गरज आहे. महाराष्ट्रापुरताच उल्लेख करावयाचा झाल्यास ६०-६१ साली ८५८ हजार विद्यार्थी शाळांमधून शिकत होते. ते आज ६,७८० हजार झाले आहेत. या विद्यार्थी संख्येच्या कित्येक पटीने वही, पुस्तक आदी कागदी साहित्य वापरले जाते. लाकडी, पेन्सिली वापरल्या जातात. त्या सर्वांचा बचतीच्या दृष्टीने विचार झाला तर आपणच कित्येक वृक्षांना जीवदान देऊ शकू. नुसता फोन नंबर किंवा त्ता लिहून देण्यासाठी फुलस्केप कागद वापरण्याची सवय असणारे महाभाग कित्येक टन कागद आयुष्यात वाया घालवतात. त्यापेक्षा रेल्वे बसच्या तिकिटाची मागील कोरी बाजू वापरली तर!

अशा रितीने प्रत्येक लहानसहान गोष्टीत आपण पर्यावरणासाठी आपआपल्यापरीने 'खारीचा वाटा' ठरेल इतके योगदान नक्कीच देऊ शकतो. शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढलेला असल्याने शहरी माणसाचा उल्लेख लेखात केला आहे. पण भारतातील कोणाही सुबुध्द, साक्षर माणसाने in the heart of heart विचार करावा. आपले वागणे तपासून पहावे, याची वेळ आलेली आहे. शाळेतल्या अनेक आठवणीत पाठकोरे कागद वापरणारे कुलकर्णी सर अजून आठवतात. त्यांच्या हातात कोणत्याही निमित्ताने कोणताही लहानमोठा कागद आला की त्याची कोरी बाजू वापरता येईल का याचा ते अंदाज घेत व त्यांच्याकडे शंका विचारण्यास गेलेल्या विद्यार्थ्याला गणिते सोडवून देण्यासाठी असे कागद वापरीत. कागद बचतीचा त्यांचा हा उद्योग किती उपयुक्त आहे व सामान्य माणूसही किती करू शकतो या दोन्ही गोष्टी तेव्हा मनावर बिंबल्या. वर्गात काम नसताना चालू असणारे पंखे, दिवे बंद करणे वाहणारे उघडे नळ बंद करणे हे ते सहज जाता-येता करीत. आज याचे महत्त्व पदोपदी जाणवते व म्हणूनच 'मला काय त्याचे' ही दृष्टी सोडून 'मलाच हे करायला हवे' हा विचार आपल्या मनात कसा येईल हा विचार अस्वस्थ करतो.

निसर्गाचे, पर्यावरणाचे मी सुध्दा देणे लागतो. हे योगदान मला दिलेच पाहिजे. या संस्काराची कधी नव्हती तेवढी गरज आज आहे. हे झाले तरच भविष्य आहे नाहीतर काही खरे नाही. त्यासाठी प्राथमिक स्तरापासून निसर्ग

जाणीवा निर्माण करण्यासाठी निसर्ग मंडळे शाळा-शाळांतून निर्माण झाली पाहिजेत. बचतीचे संस्कार हे विद्यार्थ्याला वह्या-पुस्तकांची रद्दी वहायला लावणारी शिक्षणपध्दती आमूलाग्र बदलली पाहिजे.

मला माझे देणे याच जन्मात द्यायचे आहे. त्यासाठी मी कटिबध्द आहे. याची जाणीव होऊन प्रत्येकाने जागे झाले पाहिजे.

**- मोहन पाठक,**
कार्यकारी संपादक, दिशा.

### *विस्मरणातल्या म्हणी*

- आंधळ्याशी जग सारेची आंधळे.
- आंधळ्या सासऱ्याची लाज ती कशाची?
- आंबलेला भात ताकाने गोड,
  नावडती बायको लेकाने गोड.
- आंब्याची गरज आमसुलाने नाही पुरवत.
- आईचा काळ, बायकोचा मवाळ.
- आकाशाची कुऱ्हाड कोल्ह्याचे दातावर.
- आठवणीला गोमेसारखे शंभर पाय असतात.
- आठशे आड आणि नऊशे चहाड.
- आडो माडो समुद्रासारखा वाढो.

## पहिले मराठी 'ग्रंथकार' संमेलन

पहिले संमेलन झाले ते 'ग्रंथकार' संमेलन या नावाने. ११ मे १८७८ रोजी मराठी ग्रंथकाराचे पहिले संमेलन पुण्यात भरले. 'ग्रंथकारांना उत्तेजन द्यावे, स्वस्त दराने ग्रंथ प्रसिद्ध व्हावेत व वाचकांनी दर साल पाच रुपयांचे ग्रंथ विकत घ्यावेत.' असा या संमेलनाचा मर्यादित हेतू होता.

न्या. महादेव गोविंद रानडे आणि लोकहितवादी यांच्या सहीने 'ज्ञानप्रकाश'मध्ये ७ फेब्रुवारी १८७८ रोजी एक निवेदन प्रसिद्ध करण्यात आले होते. या संमेलनाला पन्नास 'ग्रंथकार' उपस्थित होते. अध्यक्षीय निवडीचा प्रश्न आला, तेव्हा उपस्थितांनी न्या. रानडे यांनाच अध्यक्ष होण्याची विनंती केली. न्या. रानडे यांचे वय त्यावेळी केवळ ३८ होते आणि त्यांच्या नावावर एकही मराठी ग्रंथ नव्हता. पण सौजन्यशील न्या. रानडे यांना उपस्थितांच्या इच्छेचा स्वीकार करावा लागला आणि ते अध्यक्ष झाले.

दरवर्षी पाच रुपयांपर्यंत मराठी पुस्तके घेण्यासाठी हजार लोकांच्या सह्या मिळाल्यास चांगले ग्रंथ तयार करण्याची योजना होती. मात्र असे आश्वासन देणाऱ्या हजार लोकांच्या सह्या या संमेलनात गोळा होऊ शकल्या नाहीत आणि त्या दृष्टीने संमेलनाचा हेतू अयशस्वी झाला.

•••

आपण प्रेम हा शब्द फार उथळपणे वापरतो.

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. ए. के. जोशी प्राथमिक विभाग

स्त्रीकल्याण संघटनेद्वारे आयोजित केलेल्या वत्कृत्व स्पर्धेत कु. वैदेही गिरिष साठे हिने दुसरा तसेच कु. सार्थक राहुल दुसाने ह्याने तिसरा क्रमांक पटकवला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

१) डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नवी मुंबई यांनी आयोजित केलेल्या सहाव्या आंतर महाविद्यालयीन मुट कोर्ट स्पर्धेमधे आपल्या कॉलेजमधून सहभागी झालेल्या रोहित शर्मा, प्रथम वर्ष विधी, या विद्यार्थ्याने ''उत्कृष्ट संशोधक'' हे पारितोषिक मिळविले.

२) आपल्या कॉलेजचे प्रा. मिथुन बनसोडे यांनी पुणे विद्यापीठामध्ये विधी विभागाने आयोजित केलेल्या सात दिवसीय विधी संशोधन कार्यशाळेमधे सहभाग नोंदविला.

३) विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षेचे आयोजन सत्र- I, III आणि V च्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे होते-

इंग्रजी आणि मराठी प्रश्नपत्रिका प्राध्यापकांनी तयार केल्या. प्रश्नपत्रिके संदर्भात चर्चा आणि मार्गदर्शन प्राध्यापकांनी केले. त्यामधे उत्तरपत्रिका लेखन व त्यातील आवश्यक गोष्टी यावर भर देण्यात आला.

## डॉ. व्ही. एन. ब्रीम्स , ठाणे

Workshop on **"Competing through Talent"**
०६.१०.२०१२, वार्षिक कार्यशाळा २०१२

''प्रतिभेच्या / कौशल्याच्या माध्यमातून प्रतिस्पर्धा''/''स्पर्धा प्रतिभेची/कौशल्याची'' **("Competing through Talent")** या विषयांवर आधारित यावर्षीच्या कार्यशाळेला श्री. योगी श्रीराम, (Sr. V. P. Leadership Planning & Talent Acquisition & L&T Ltd.) यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या प्रसंगी औद्योगिक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची/प्रतिभेची आवश्यकता, प्रतिवर्षी ५९% नी वाढणारे सेवाक्षेत्र आणि भविष्यातील या क्षेत्रातील संधी, सध्याच्या काळात कार्यरत कर्मचाऱ्यांनी

वेळ – ६ ते ९ संध्याकाळी

| दिनांक | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|
| १५.१०.१२ | कामगार कायदा | प्रशासकीय कायदा | दिवाणी प्रक्रिया कायदा |
| १६.१०.१२ | करार कायदा | कौटुंबीक | फौजदारी प्रक्रिया |
| १७.१०.१२ | कायद्याच्या भाषा आणि इंग्रजी | कंपनी | आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानव अधिकार |
| १८.१०.१२ | नुकसान भरपाई कायदा | मालमत्ता हस्तांतर कायदा | कायद्याचा-अन्वयार्थ |

प्रेमभावना एकच असते, नाती वेगळी असतात.

आणि भावी व्यवस्थापकांनी स्वतःला कुशल बनवणे कसे आवश्यक आहे, इत्यादी मुद्द्या बरोबरच वाढत्या आर्थिक घोटाळ्यांची संख्या पाहता आजच्या सकुशल मनुष्यबळाला मूल्य शिक्षण देण्याची गरजही त्यांनी आपल्या बीजभाषणात व्यक्त केली.

त्यानंतर डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थे (डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) चे काही प्राध्यापक आणि काही विद्यार्थी यांनी एकत्रितपणे केलेल्या संशोधन प्रकल्पावर आधारित माहितीचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सरसंचालक डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी प्रकल्पाची पार्श्वभूमी, विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधीने प्रकल्पासाठीचे सर्वेक्षण आणि माहिती संकलन करताना आलेले अनुभव या विषयावर सहाय्यक स्वप्ना ताम्हणकर यांनी प्रकल्पाची संशोधन पद्धती या विषयावर, सहाय्यक सुखदा तांबे यांनी प्रकल्पाच्या संशोधनाचे निष्कर्ष याविषयावर, सहाय्यक तेजल धुल्ला यांनी औद्योगिक क्षेत्रातील प्रचलित प्रतिभा/कौशल्य व्यवस्थापन पद्धती या विषयावर डॉ. के. सुर्यानारायणन् (संचालक डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी संशोधन निष्कर्षांचे विवेचन या विषयावर, तर पुन्हा डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी ''प्रतिभेच्या/कौशल्याच्या माध्यमातून प्रतिस्पर्धा''/''स्पर्धा प्रतिभेची/कौशल्याची'' या संशोधन प्रकल्पाचे एकंदरित चिंतन सादर केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांच्या गटांनी किरकोळ व्यापारक्षेत्र, वैद्यकीय आणि पूरक सेवाक्षेत्र, वित्तीय क्षेत्र, संपर्क/दूरसंचार सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, विमान/हवाई सेवा क्षेत्र अशा विविध औद्योगिक क्षेत्रातील कौशल्य व्यवस्थापन आणि कौशल्य तुटवडा या विषयावर सादरीकरण केले.

त्यानंतर भारतीय उद्योगातील कौशल्य तुटवडा आणि कौशल्य व्यवस्थापन या विषयावर एका परिसंवादाच्या आयोजन करण्यात आले. त्यामध्ये

श्री. एस.आर. लोहोकरे, (MD, National Peroxide Ltd.)

श्री. एन. के. मारवाह, (Founder & MD, Magna Services India Pvt. Ltd.)

श्री. प्रशांत करमळकर, (Managing Partner, Circular Angle)

श्री. दीपक गाडेकर, (Head Corporate HR, Voltas Ltd.)

श्री. अरुण चीत्लान्गिया, (Founder & CEO Training Tree)

श्री. सुधीर खांबेटे, (V.P.Marketing, Thermo Fisher Ltd.)

या मान्यवर तज्ज्ञांनी सहभाग घेतला आणि आपली मते व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रात उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या तीन विजेत्या गटांना प्रमाणपत्र देण्यात आले आणि त्यानंतर डॉ. पी. एम. केळकर, (अधिष्ठाता, डॉ. व्ही. एन. ब्रीम्स) यांनी सादर केलेल्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## तंत्रनिकेतन वार्ता

तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांचा गुण-गौरव व सत्कार सोहळा

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतनमधील सन २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई (MSBTE) तर्फे घेण्यात आलेल्या परिक्षेमध्ये जे विद्यार्थी घवघवीत यश संपादन करून तंत्रनिकेतनात अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाले. त्यांचा गुणगौरव व सत्कार सोहळा मंगळवार २३ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या दरम्यान तंत्रनिकेतनमधील ए. व्ही. एम. मध्ये पार पडला. सदर कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्राचार्य दि.कृ.नायक, माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार, प्रोफेसर व्ही. एस. भाकरे आणि एस. एम. गुप्ते मॅडम हजर होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. सौ. स्वाती जोशी यांच्या स्वागतापर गीताने झाली. त्यानंतर माजी प्राचार्य एस. एस.

मुजुमदार यांनी उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी 'Habbit of winning' हा कानमंत्र दिला. प्रोफेसर भाकरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य दि. कृ. नयक यांनी पॉवर पॉईन्टद्वारे 'Corevalve' विषयीचे महत्त्व उपस्थितांना करून दिले. गुप्ते मॅडमनी कवितेद्वारे मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर अविश्रांत मेहनत घेवून आपआपल्या विषयात १००% निकाल लावणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक देवून सत्कार करण्यात आला.

१००% निकाल लावणारे प्राध्यापक आणि त्याचे विषय खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| १. | प्रोफेसर एस. एस. मुजुमदार (केमिकल इंजिनिअरींग) | Fluid Flow Operation<br>Mass Transfer Operation |
| २. | सौ. एस. ए. जोशी (केमिकल इंजिनिअरींग) | Energy Management<br>Petro Chemicals (Elective 2) |
| ३. | सौ. निलम केवलरमानी (केमिकल इंजिनिअरींग) | Chemical Engineering Drawing |
| ४. | मिस. नमिता गायकवाड (कम्प्युटर इंजिनिअरींग) | Computer Networks |
| ५. | सौ. एस. एस. भावसार (कम्प्युटर इंजिनिअरींग) | Computer Security |
| ६. | मिस. दिप्ती मेस्त्री (कम्प्युटर इंजिनिअरींग) | Management (Co)<br>Management (CH) |
| ७. | सौ. आर. यु. पाटील (EPS - Dept.) | A. C. Machine |
| ८. | सौ. अनिस ॲलिस (EPS - Dept.) | Maintainence & Repair of electrical equipment. |
| ९. | सौ. के. एस. आगाशे (IE - Dept.) | Embedded Systems |
| १०. | सौ. ए. एस. दिवाकर (IE - Dept.) | Principle of Computer architechnice & maintenance<br>Data Communication & networking |

सत्वगुणी माणूस भगवतभक्तीचा आश्रय घेऊनच ज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न करतो.

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ११. | सौ. सांथी एम. एल. (IE - Dept.) | Industrial Automation |
| १२. | सौ. सारिका कोरडे (IE - Dept.) | Applied electronics |
| १३. | मिस. अनुमी शेणॉय (IE - Dept.) | Control System |
| १४. | सौ. व्ही. ए. जोशी (IS - Dept.) | Control System |
| १५. | सौ. श्रेया घैसास (IS - Dept.) | Communication skills |
| १६. | सौ. जी. ए. पुजारे (MV - Dept.) | Therapeutic equipment |
| १७. | सौ. शीतल म्हात्रे (MV - Dept.) | Analytical equipment<br>Medical Imagine equipment |
| १८. | मिस. मुग्धा जोशी (MV - Dept.) | Installation Maintenance &<br>Servicina of Medical equipment. |

दरम्यान तंत्रनिकेतनमध्ये सतत २० वर्षे सेवा बजावणाऱ्या शिकाऊ व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार मान्यवराच्या हस्ते मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. मागील वर्षात २० वर्ष पूर्ण होणाऱ्या व चालू वर्षात २० पूर्ण करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पुढीलप्रमाणे :

सत्कारमूर्ती शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी

१) डॉ. सौ. उषा राघवन २) श्री. आर. डी. बोकडे
३) मिस. एम. एम. ताटके ४) सौ. एन. एस. नांगरे
५) सौ. एस. एस. शेलार ६) सौ. एम. व्ही. पत्की
७) श्री. बी. सी. मोरे

शेवटी मान्यवरांच्या शुभहस्ते तंत्रनिकेतनात अव्वल आलेल्या अशा गुणवंत विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके व प्रशस्तिप्रत्रक देवून गौरव करण्यात आला. सदर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व पालकवर्ग हजर होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. एम. विश्वेश्वरय्या (भारतीय इंजिनियर) याच्या विषयीचा एक माहितीपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिस. दिप्ती मेस्त्री हिने केले.

शेवटी कार्यक्रमाची सांगता प्रा. सौ. किर्ती आगाशे यांच्या पसायदान गायनाने झाली.

तंत्रनिकेतन वृत्त संकलन
श्री. चंद्रकांत शिंगाडे
वि. प्र. मंडळाचे,
तंत्रनिकेतन, ठाणे.

●●●

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


●●●

# गीतासंदेश



- कशाला व्यर्थ चिंता करीत आहेस? कुणाला घाबरतो आहे? तुला कुणीही मारु शकत नाही. आत्मा अमर आहे.
- जे झाले आहे, जे होत आहे आणि जे होणार आहे ते सारे ईश्वरेच्छेने होत असल्याने ठीक आहे. गतकाळाचा पश्चाताप नको, भविष्याची चिंता नको. वर्तमानातच जग!
- तुझे काय गमावले म्हणून तू शोक करीत आहेस? तू काय घेऊन आला होतास? तू स्वतःचे असे काय निर्माण केलेस? जे मिळविलेस ते परमेश्वराकडूनच मिळविलेस. जे गमावलेस ते या भगवद्‌भूमीमधीलच होते. तू रिकाम्या हाताने आला आहेस व रिक्तहस्ते जात आहेस! तुझे असे काही नव्हते आणि असणारही नाही. तेव्हा या नश्वर गोष्टींना माझे समजून वृथा शोक करु नकोस!
- माया परिवर्तनशील आहे. संसार क्षणभंगुर आहे. एका क्षणात दरिद्री कोट्याधीश होतो. करोडपती भिक्षाधीश होतो. मृत्युही जीवन आहे. जीवनात मृत्यु आहे. लहान थोर, आप-पर सारे भेद मनातून नष्ट कर. सारे तुझे आहे. तू सर्वांचा आहेस!
- तू शरीर नाहीस, शरीर तुझे नाही. तू शरीराचा नाहीस. शरीर हा पंचभूतांचा मिलाफ आहे. त्यातील आत्मा आच शाश्वात आहे!
- स्वतःचे सर्वस्वसमर्पण भगवंताचे ठायी तू कर. तोच एक आश्रयस्थान, शरण्यधाम आहे. त्याला जाणून तू भय, शंका, शोक दुःखातून मुक्त हो. प्रत्येक कर्माची 'हरि ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' या भावनेने भगवंताचे चरणी आहुती दे. हा कर्मयोगाचा महान यज्ञ आहे यातच जीवन मुक्तीचे सार आहे. गोविंद परमानंद, शामसुंदर, नंदकुमार! तू एक महासागर आहे. मी एक बिंदू आहे. तू मला आपल्या अंतरात समावून घे.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.